



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ९३ * नांदेड * गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# अखेर युद्ध थांबलं, अमेरिका-इराणमध्ये दोन आठवड्यांसाठी शस्त्रसंधी जाहीर

## युद्धविरामाच्या घोषणेमुळे कच्च्या तेलाच्या किंमती घसरल्या

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)-** मध्य-पूर्वेत सुरू असलेल्या इराण-अमेरिका यांच्यातील युद्ध अखेर थांबलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविराम जाहीर केला आहे.

ट्रम्प यांनी मंगळवारी जाहीर केले की, अमेरिका इराणसोबत दोन आठवड्यांच्या युद्धविरामासाठी सहमत झाली आहे. त्यांनी इराणवर मोठा हल्ला करण्याची आणि तेथील संपूर्ण संस्कृती नष्ट करण्याची धमकी दिल्यानंतर काही तासांतच हे विधान केले. हा युद्धविराम घडवून आणण्यात पाकिस्ताननेही महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उल्लेख ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये केला आहे. तर दुसरीकडे ट्रम्प यांनी इराणसोबत युद्धविरामाची घोषणा केल्यानंतर शेअर बाजारात तेजी दिसून येत आहे. इराण युद्धातील युद्धविरामाच्या घोषणेनंतर दिलासा मिळाल्याने, कच्च्या तेलाच्या किंमती घसरल्या आणि अमेरिकन शेअर बाजारात तेजी दिसून आली.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत युद्धविरामाची घोषणा केली आहे. त्यांनी दोन आठवड्यांसाठी लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रम्प यांच्या निर्णयानंतर शेअर बाजारात तेजी दिसून येत आहे. अमेरिकेने इराणसोबत युद्धविरामाची घोषणा केल्याने शेअर बाजारांना दिलासा मिळाला आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीही प्रति बॅरल १०० डॉलरपर्यंत मोठ्या प्रमाणात घसरल्या.



तर अमेरिकन शेअर बाजारात मोठी तेजी आल्याचे दिसून आले आहे. डाऊ जोन्स फ्युचर्स ९०० अंकांनी वधारले. अध्यक्ष ट्रम्प यांनी इराण युद्धात दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा केल्यानंतर आर्थिक आघाडीवर ही तेजी दिसून येत आहे. गुरूवारी बाजार उघडल्यानंतर भारतासह आशियाई बाजारांमध्येही अशीच तेजी दिसू शकते. निफ्टी ग्रीन झोनमध्ये प्रवेश करून असेच संकेत देत आहे.

दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझची सामुद्रधुनी तात्काळ आणि सुरक्षितपणे पुन्हा सुरू करण्याच्या अटीवर इराणसोबत दोन आठवड्यांच्या युद्धविरामास सहमती दर्शवल्याचे सांगितल्यानंतर, बुधवारी अमेरिकेच्या वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट कच्च्या तेलाच्या किमतीत प्रति बॅरल जवळपास २० डॉलरची घसरण झाली.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर यांच्याशी चर्चा केल्यानंतर युद्धविरामाचा निर्णय घेण्यात आला. ट्रम्प यांनी असेही म्हटले की, तणाव कमी करण्यासाठी इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरू करणे हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## राज्यात उत्खनन रॉयल्टी, बिनशेती प्रक्रिया डिजीटल होणार

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यातील बांधकाम क्षेत्रासाठी दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. उत्खनन रॉयल्टी, बिनशेती प्रक्रिया डिजीटल होणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतची माहिती दिली आहे. बावनकुळे यांनी क्रेडाईचे सर्व प्रश्न मार्गी लावले आहेत. बिनशेतीसाठी आता जिल्हाधिकाऱ्यांकडे जाण्याची आवश्यकता नाही. ही प्रक्रिया दहा दिवसात ऑनलाईन करण्यात येणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी केली.

बांधकाम करताना उत्खनन करण्यात आलेले गौण खनिज त्याच जागी वापरले तर त्याला रॉयल्टी माफ करण्यात आली असून, बिनशेतीसाठी आता जिल्हाधिकारी यांच्याकडे जाण्याची आवश्यकता नसून ही प्रक्रिया दहा दिवसात ऑनलाईन करण्यात येणार आहे. याबरोबरच महापालिका आणि मिळकतपत्रावरील नोंदीबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे आश्वासही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

## अंदाज समिती नांदेडमध्ये दाखल; पहिल्या दिवशी २७ पैकी केवळ ८ आमदार उपस्थित

**नांदेड (प्रतिनिधी)-** मागील दोनवेळा विधानमंडळ अंदाज समितीची नांदेड दौऱ्यावर येणार होती. परंतु तांत्रिक कारण सांगून हा दौरा रद्द करण्यात आला होता. या समितीला अखेर बुधवारी मुहूर्त मिळाला. त्यानुसार समिती नांदेडमध्ये दाखल झाली. बुधवारी सकाळी १० वाजता नियोजन भवनात बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी तीन दिवसांच्या नियोजनाचे सादरीकरण केले. समितीचे अध्यक्ष आ. अर्जुन खोतकर यांचे स्वागत केल्यानंतर स्वागताला उत्तर देताना जिल्हाधिकाऱ्यांच्या सादरीकरणाचे त्यांनी कौतुक केले. या समितीत एकूण २७ सदस्य आहेत, त्यापैकी पहिल्या दिवशी केवळ ८ सदस्यांनी हजेरी लावली.

धुळे जिल्ह्यातील शासकीय विश्रामगृहात अंदाज समितीच्या अध्यक्षाच्या स्वीय सहायकाकडे एक कोटींपेक्षा अधिक रक्कम सापडल्यानंतर ही समिती वादाच्या भोवऱ्यात आली होती. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील हा समितीचा दौरा दोनवेळा रद्द करण्यात आला होता. आता दि. ८ ते १० एप्रिलदरम्यान ही समिती जिल्ह्यात मुक्कामी आहे.

धुळे जिल्ह्यात २२ मे २०२५ रोजी अंदाज समितीच्या दौऱ्यात समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहायक आणि विधीमंडळ कक्ष अधिकारी किशोर पाटील यांच्या ताब्यातील खोली क्र. १०२ मध्ये १ कोटींपेक्षा जास्त रोख रक्कम सापडली होती. आ. अनिल गोटे यांनी यासंदर्भात तक्रार केल्यानंतर धुळे जिल्ह्यातील पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकून ती रक्कम जप्त केली. त्यानंतर किशोर पाटील यांना निलंबितही करण्यात आले होते. बुधवारपासून नांदेड जिल्ह्यात समितीच्या दौऱ्याला सुरुवात झाली असून या समितीत एकूण २७ सदस्य आहेत. समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर आहेत. पहिल्या दिवशी झालेल्या बैठकीत आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ.सदाभाऊ खोत, आ. सतीश चव्हाण, आ. कैलास पाटील, आ. रोहित पाटील, आ. शेखर निकम यांच्यासह मंत्रालयातील विविध सचिवांचा समावेश आहे.

सकाळी झालेल्या या बैठकीत दोन दिवसांच्या दौऱ्यासंदर्भात पूर्ण माहिती देण्यात आली. पत्रकारांशी संवाद साधण्याचेही समितीतील सदस्यांनी टाळले. तसेच जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनाही कोणतीही माहिती देण्यास मज्जाव करण्यात आला होता. बैठकीचे फोटो देखील कुठेही व्हायरल करू नका, असा सज्जड इशारा देण्यात आला. या बैठकीसाठी जिल्हाधिकारी राहुल कडिले यांनी सदस्यांच्या निवासाची व्यवस्था, दौऱ्यात त्यांच्यासमवेत द्यावयाचे अधिकारी, दौऱ्याचे नियोजन, भेटीचे नियोजन याबाबत संपूर्ण माहिती देण्यात आली.

या समितीने बुधवारी दिवसभर काय केले, यासंदर्भात मात्र कुठेही वाच्यता न करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. केवळ शेवटच्या दिवशी समितीचे अध्यक्ष प्रसिद्धीमाध्यमांशी संपूर्ण दौऱ्याची माहिती देणार असल्याचे सांगण्यात आले.

## युद्धविरामनंतरही इराणमध्ये पुन्हा झाला हल्ला

**तेहरान (वृत्तसंस्था)-** अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांचा युद्धविराम झाला असला तरी या वाटाघाटींनंतर काही तासांतच इराणमध्ये पुन्हा हल्ला झाला आहे. इराणच्या लावान बेटावरील तेल शुद्धीकरण प्रकल्पाला लक्ष्य करण्यात आले आहे. हा शत्रूने केलेला हल्ला असल्याचे इराणी यंत्रणेने म्हटले आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक वेळेनुसार १० वाजता सुविधेला आग लागली. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग आटोक्यात आणण्यासाठी सुरक्षा आणि अग्निशमन यंत्रणा तात्काळ तैनात करण्यात आली.

तेल शुद्धीकरण प्रकल्पावर झालेल्या हल्ल्यानंतर इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) प्रत्युत्तर दिले असून कोणत्याही हल्ल्याला त्यापेक्षा अधिक आक्रमकतेने उत्तर दिले जाईल, असे सांगितले. आयआरजीसीने पर्शियन आखातामधील काही ठिकाणांना लक्ष्य केले. तसेच सौदी अरेबिया, यूएई, कतार, बहारीन आणि कुवैतमधील काही ठिकाणांवर हल्ले केले आहेत.

आयआरजीसीने दिलेल्या निवेदनात म्हटले की, इराणने विविध देशात तब्बल २५ ठिकाणांना लक्ष्य केले आहे. अमेरिकेवर आमचा विश्वास नाही आणि कोणत्याही हल्ल्याला तेवढ्याच ताकदीने प्रत्युत्तर देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.

आयआरजीसीने टेलिग्राम चॅनेलवर दिलेल्या प्रतिक्रियेनुसार, आमच्या शत्रूने नेहमीच कपटाचा मार्ग निवडला. आमचा त्यांच्या आश्वासनावर बिलकुल विश्वास नाही. आमच्यावर जर कोणताही हल्ला झाला तर आम्ही अधिक आक्रमकतेने त्यावर उत्तर देऊ. आखाती देशांनी अमेरिकेबरोबर असलेले त्यांचे संबंध कमी करून त्यांना सहकार्य करणे थांबवावे. इराणचे सैनिक हे फक्त सर्वोच्च नेते, लष्करी दलाचे एकमेव नेते अयातुल्ला मोजतबा खामेनी यांच्या आदेशाचे पालन करतात आणि खामेनी यांचे बोट सदैव बंदुकीच्या चापावर आहे, हे लक्षात ठेवावे, अशा शब्दांत इराणने इतर आखाती देशांना इशारा दिला आहे.

## आता जेईई-नीट परीक्षेचे अपडेट्स फेसबुक, इंस्टाग्रामवर; एनटीएचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** इंजिनिअरिंगसाठीची जेईई, वैद्यकीय प्रवेशासाठीची नीट आणि विद्यापीठ प्रवेशासाठीची सीयुईटी अशा अत्यंत महत्त्वाच्या परीक्षांचे आयोजन करणाऱ्या एनटीएने आता अधिकृतपणे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सक्रिय होण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्र, निकालाची तारीख आणि महत्त्वाच्या सूचना थेट फेसबुक आणि इंस्टाग्रामवर उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना थेट संपर्क साधण्याचा प्रयत्न होणार आहे. आतापर्यंत विद्यार्थ्यांना कोणत्याही अपडेटसाठी एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावर वारंवार जाऊन चेक




करावे लागत असे. अनेकदा सर्व्हर डाऊन होणे किंवा माहिती उशिरा मिळणे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण असायचे. मात्र, आजची तरुण पिढी सर्वाधिक वेळ इंस्टाग्राम आणि फेसबुकवर घालवते, हे लक्षात घेऊन एनटीएने या प्लॅटफॉर्मचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे.

## बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवारांविरोधात तब्बल ५५ उमेदवार रिंगणात

**पुणे (प्रतिनिधी)-** बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होईल आणि सुनेत्रा पवार यांना सहानुभूतीचा लाभ मिळेल, असा महायुतीचा सुरुवातीचा अंदाज होता. मात्र, प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत हा अंदाज पूर्णपणे फोल ठरला असून, या निवडणुकीच्या रिंगणात तब्बल ५५ उमेदवारांनी उडी घेतल्याने लढतीचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. सुरुवातीला एकतर्फी वाटणारी ही पोटनिवडणूक आता अत्यंत चुरशीच्या आणि रंजक वळणावर येऊन ठेपली आहे.

या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आकाश मोरे यांच्या रूपाने धनगर समाजाचा उमेदवार रिंगणात उतरवून जातीय कार्ड खेळल्याने राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची



झाली आहेत. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यासमोरील आव्हान वाढले असून, ही लढाई आता अपेक्षेइतकी सोपी राहिलेली नाही. या बदलत्या राजकीय पार्श्वभूमीवर रणनीती आखण्यासाठी सुनेत्रा पवार यांनी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सुनेत्रा पवार यांना शब्दही दिला असल्याचे समजते.

## इराणच्या हॅकर्सचा अमेरिकेतील औद्योगिक क्षेत्रावर सायबर हल्ला

**तेहरान (वृत्तसंस्था)-** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणशी संबंधित हॅकर्सनी आता अमेरिकेच्या भूमीवर 'अप्रत्यक्ष' युद्ध पुकारले आहे. अमेरिकेतील तेल, वायू आणि पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या औद्योगिक प्रकल्पांना लक्ष्य करत हॅकर्सनी डेटा नष्ट करण्याचा आणि कामकाजात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला आहे. या गंभीर प्रकारानंतर एफबीआय आणि अमेरिकन सुरक्षा यंत्रणांनी देशभरातील पायाभूत सुविधा चालकांसाठी तातडीचा इशारा दिला आहे.


## रूग्णालयातील खून प्रकरण; दोन सहायक फौजदार निलंबित

**नांदेड (प्रतिनिधी)-** रूग्णालयातील खून प्रकरणी कर्तव्यात हलगर्जीपणा केल्यावरून भाग्यनगर ठाण्यातील दोन सहायक फौजदारांना निलंबित करण्यात आले आहे.

शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. ४ एप्रिल रोजी रात्री सुमारे दीड वाजेच्या सुमारास दोन गटांमध्ये गंभीर स्वरूपाचे भांडण झाले. सदर भांडणामध्ये धारदार शस्त्राचा वापर होऊन एक जण जागीच ठार झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले होते. घटनेनंतर मयतास तसेच जखमींना तात्काळ उपचारासाठी वजिराबाद शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. उपचारादरम्यान जखमींपैकी एक जण मयत झाला, तर दुसरा जखमी गंभीर अवस्थेत होता. पुढील उपचारासाठी त्यास शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे रेफर करण्यात आले होते.

दरम्यान, सदर जखमीस उपचारासाठी रुग्णालयात नेत असताना रुग्णालय परिसरातच एका व्यक्तीने धारदार शस्त्राने त्याच्यावर पुन्हा हल्ला केल्याची अत्यंत गंभीर घटना घडली. यावेळी कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून सदरील हल्ला रोखण्यासाठी अपेक्षित तत्परता व दक्षता दाखविण्यात हलगर्जीपणा दिसून आला व योग्य ती कारवाई करण्यात आली नसल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम २५ तसेच मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आनंद कनिराम राठोड (ब. न. ५१३२) आणि नागेश गणपत वाडियार (ब. न. ५२१५) यांना प्राथमिक चौकशीच्या अधीन राहून निलंबित करण्यात आले आहे.

तसेच संबंधित पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांना सुध्दा कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून विष्णुपुरी सरकारी दवाखाना येथे सुरक्षा गार्ड म्हणून नेमण्यात आलेले मेस्को सुरक्षा रक्षकाच्या प्रमुखास शिस्तभंगाच्या कारवाई संदर्भाने पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी पुढील विभागीय चौकशी सुरू असून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तर तिकडे शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी मेस्को कंपनीच्या संबंधित कर्मचाऱ्यांचा त्यांच्या वरिष्ठाकडून अहवाल मागविला आहे. शासकीय रुग्णालयात या कंपनीचे जवळपास २३९ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र घटना घडल्यानंतर या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप केला नाही, असे व्हायरल झालेल्या व्हिडिओवरून दिसून येत आहे.




## हिमायतनगरातील उमर चौकात दोन गटांत तलवारीने हाणामारी; तीन जण जखमी

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरात चार दिवसांत खुनाच्या पाच घटना ताज्या असतानाच हिमायतनगर येथे दोन गटांत तलवारीने बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी दुपारी तुंबळ हाणामारी झाली. पैशांच्या देवाण-घेवाणीतून झालेल्या वादातून दोघे गंभीर जखमी झाले असून अन्य एक जण किरकोळ जखमी झाला आहे. या तिघांनाही नांदेडच्या शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

हिमायतनगरातील हॉटेल व्यावसायिक शेख शाकीर हुसेन शे. मोहमद यांनी एका व्यक्तीला पैसे दिले होते. ते त्यांनी परत मागितले. संबंधिताने ही बाब एका नगरसेवकाला सांगितली असता त्याने शेख शाकीर यांच्या हॉटलवर येऊन तू आमच्या वार्डातील माणसाला पैसे का मागतो, अशी विचारणा केली. प्रारंभी हा वाद किरकोळ वाटत असतानाच मारहाण करायला सुरुवात झाली. त्यानंतर शेख शाकीर हुसेन यांना अज्ञातस्थळी नेऊन मारहाण करण्यात आली. हा प्रकार शेख




शाकीर हुसेन यांच्या कुटुंबियांना कळाल्यानंतर शेख रईस व शे. अब्दुल कलीम लाला यांनी घटनास्थळ गाठत संबंधितांना जाव विचारला. परंतु या वादावादीचे रूपांतर हाणामारीत होत दोन्ही गटाने एकमेकांवर चाकू व तलवारीने वार केले. हिमायतनगरच्या उमर चौकात घडलेल्या या घटनेत तलवारी, चाकू यासारख्या धारदार शस्त्रांचा मुक्त वापर करण्यात आला. यात शेख शाकीर हुसेन शे.मोहमद, शेख रईस आणि शेख कलीम लाला यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. यात शेख रईस यांच्या पोटावर तलवारीचे वार झाल्याने ते गंभीर जखमी झाले तर शे. अब्दुल कलीम लाला यांच्या हातावर तलवारीचे घाव बसले. रक्तबंबाळ तिघांपैकी २ गंभीर जखमींना हिमायतनगरच्या ग्रामीण रुग्णालयात प्रथमोपचार करून प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नांदेड येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. शेख शाकीर याच्यावर हिमायतनगर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या प्रकरणात हिमायतनगर येथील काँग्रेसचे नगरसेवक शेख इलियास यांच्यासह शेख अफरोज, शेख फिरोज, शेख इमरान, शेख इजाज, शेख जावेद, शेख मेहमूद तहारी यांचा सहभाग असल्याची माहिती समोर येत आहे. हिमायतनगरच्या मुख्य बाजारपेठेत दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. दरम्यान या प्रकरणी सायंकाळी एकूण दोन्ही गटातील ७ जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इराण-अमेरिका युद्ध थांबताच शेअर बाजारात मोठी उसळी, सेन्सेक्स २५०० अंकांनी वधारला

**मुंबई (प्रतिनिधी)-** जागतिक राजकारणातील महत्त्वाच्या घडामोडींचे सकारात्मक पडसाद बुधवारी भारतीय शेअर बाजारात उमटले आहेत. युद्धाच्या छायेखाली असलेल्या जगाला 'सीझफायर'च्या (युद्धविराम) निर्णयाने मोठा दिलासा मिळाल्याने आज भारतीय शेअर बाजार एका मोठ्या उसळणीसह उघडला. प्री-ओपनिंग सत्रातच सेन्सेक्सने तब्बल २७०० हून अधिक अंकांची ऐतिहासिक झेप घेतल्याने गुंतवणूकदारांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

युद्धविरामानंतर भांडवली बाजारात तेजी आल्याचं दिसून येत आहे. सेन्सेक्समध्ये २ हजार ७०० अंकांची उसळी तर निफ्टी ७५० अंकांनी वधारला आहे. आयटी, मेटल, रिअॅल्टी क्षेत्रातील समभागात मोठी तेजी दिसून येत आहे. कच्च्या तेलाच्या भावात देखील मोठी घसरण झाली आहे, १३ टक्क्यांनी दर पडले आहेत.



कच्च्या तेलाचे भाव ९५ डॉलर प्रति बॅरलवर आले आहेत. अदानी पोर्ट, इंडिगोच्या समभागात मोठी उसळी पहायला मिळत आहे.

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या संघर्षात 'सीझफायर' म्हणजेच युद्धविरामाची घोषणा झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सकारात्मक संकेत मिळाले आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली स्थिरता आणि जागतिक पुरवठा साखळी पुन्हा सुरळीत होण्याची शक्यता निर्माण झाल्याने जगभरातील शेअर बाजारांनी या निर्णयाचे स्वागत केले. याचाच थेट परिणाम बुधवारी मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स आणि राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीवर दिसून आला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# अमेरिकेची युद्धखोरी: बौद्धिक दिवाळखोरी

इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेली अलीकडील भाषणं अपेक्षित दिलासा देण्यात अपयशी ठरली आहेत. उलट, या भाषणांतून अनेक नवे प्रश्न निर्माण झाले असून, जागतिक स्तरावर अस्वस्थतेचे वातावरण अधिक गडद झाले आहे. इराण विरुद्ध त्यांनी केलेली जहाल टीका ही अमेरिकेच्या इतिहासातील पहिलीच वेळ असावी ज्यामुळे अमेरिकेची प्रतिमा पूर्णपणे धुळीस मिळाली आहे. युद्धाचा शेवट कसा आणि कधी होणार, याबाबत कोणतीही स्पष्ट दिशा न मिळाल्याने केवळ राजकीयच नव्हे तर आर्थिक अनिश्चितताही वाढली आहे. सध्याची परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे केवळ पश्चिम आशियाच नव्हे, तर संपूर्ण जग आर्थिक आणि राजनैतिक अस्थिरतेच्या छायेत आले आहे. विशेषतः इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवण्याचा इशारा दिल्याने जागतिक तेलपुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. या सामुद्रधुनीतून जगातील मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची वाहतूक होते. त्यामुळे येथे कोणतीही अडचण निर्माण झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसू शकतो. अशा संवेदनशील क्षणी जगाचे लक्ष ट्रम्प यांच्या भाषणाकडे लागले होते. ट्रम्प यांनी वारंवार युद्धाचे समर्थन करण्यावरच अधिक भर दिला. त्यांनी इराणच्या शासनाने गेल्या अनेक दशकांपासून अमेरिकेला दिलेल्या धमक्यांचा उल्लेख करत अण्वस्त्रप्राप्ती रोखण्यासाठी युद्ध अपरिहार्य असल्याचा दावा केला. तथापि, हा युक्तिवाद उशिरा मांडला गेल्याचे जाणवते. युद्ध सुरू होण्यापूर्वी अशी भूमिका अधिक प्रभावी ठरली असती. उलट, युद्धादरम्यान त्यांच्या बदलत्या भूमिकेमुळे त्यांच्या विधानांवरील विश्वासार्हता कमी झाल्याचे दिसते. वास्तविक पाहता अमेरिकेने इराणवर हे युद्ध लादले आहे हे त्यांच्या उद्धट बुद्धीचे प्रतीक आहे. ही दादागिरी इराण सहन करायला तयार नाही. ट्रम्पने इराणला आणखी कमजोर करण्याचे संकेत देत संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता दर्शवली. वीज केंद्रे आणि तेलसाठ्यांवर हल्ल्याच्या धमक्या देणे हे केवळ तणाव वाढवणारे पाऊल ठरू शकते. त्यामुळे जागतिक गुंतवणूकदार, उद्योगजगत आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिंता कमी होण्याऐवजी अधिक वाढण्याची शक्यता आहे. युद्धाच्या संदर्भात ट्रम्प यांनी काही महत्त्वाचे प्रश्न अनुत्तरित ठेवले आहेत. त्यांनी इराणच्या लष्करी क्षमतेला मोठा धक्का दिल्याचा दावा केला, परंतु त्याचे ठोस पुरावे सादर केले नाहीत. अणुऊर्जा केंद्रे नष्ट केल्याचे सांगितले, मात्र समृद्ध युरेनियम साठ्यांचे काय झाले, याबाबत मौन बाळगले. तसेच इराणमधील सत्तांतराचे संकेत दिले असले तरी प्रत्यक्षात सत्ताधारी व्यवस्था अद्याप कायम आहे आणि ती अधिक आक्रमक होण्याची चिन्हे दिसत आहेत. यामुळे परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची बनत आहे. राजकीयदृष्ट्याही ही परिस्थिती ट्रम्प यांच्यासाठी आव्हानात्मक ठरत आहे. अमेरिकन जनतेमध्ये या युद्धाबाबत वाढती नाराजी दिसून येत आहे. विशेषतः या संघर्षामुळे अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. महागाई, इंधनदरवाढ आणि जागतिक बाजारातील अनिश्चितता यामुळे सामान्य नागरिक त्रस्त आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नाराजी राजकीय परिणाम घडवू शकते. जागतिक स्तरावरही या युद्धाचे परिणाम दुरगामी असू शकतात. दीर्घकाळ चालणाऱ्या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक आणि आर्थिक वाढ यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. इतिहास पाहता, दीर्घकालीन युद्धे केवळ संबंधित देशांनाच नव्हे तर संपूर्ण जगाला आर्थिक मंदीकडे ढकलतात. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत स्पष्ट धोरण, ठोस राजनैतिक प्रयत्न आणि युद्धातून बाहेर पडण्याची योजना अत्यंत आवश्यक आहे. आज गरज आहे ती भावनिक भाषणांची नव्हे, तर ठोस कृती आणि स्पष्ट धोरणांची. अन्यथा, हा संघर्ष केवळ राजकीय अस्थिरतेपुरता मर्यादित राहणार नाही, तर तो जगाला नव्या आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर नेऊ शकतो.

# मुलांना जपणार कसं ?

सध्या गाजत असलेलं प्रकरण अशोक खरातचं. त्या प्रकरणाची शाही वाळते न् वाळते तोच नागपुरात घडलं एका लहान बालकाचं हत्याकांड. गिट्टीखदान या भागात राहणाऱ्या निरपराध लहान बालक असलेल्या अथर्वचा गळा घोटून मारेकऱ्यांनी हत्या केली व खंडणीचं कारण पुढं केलं. म्हणतात की, अशोक खरातनं भोंदूगिरी करीत अनेक नरबळीही घेतले. ज्यात लहान मुलांचा समावेश असू शकतो. तसं पाहिल्यास माणूस आज कितीही शिकला असला तरी तो शहाणा झालेला नाही. तो आजही अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला असून, आजही अंधश्रद्धाच पाळतो. हे एकंदर त्याच्या वर्तनावरून दिसून येते. तर नागपुरात अथर्वसारख्या लहान मुलांची हत्या होण्यातून आता लहान मुलंही सुरक्षित नाहीत याचा प्रत्यय येतो. त्यातच आता प्रश्न पडलेला आहे की, आपल्याला असलेल्या लहान मुलांना जपावं कसं?

आज मुलांना जपा, असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. तसंच घडलंय नागपुरात. तशी नागपुरात अपहरणाची बरीच प्रकरणं घडली. चार प्रकरणं लहान लहान बालकांबाबत घडली. ज्यात आदित्य, युग, कुश आणि आता अथर्व. गिट्टीखदानचा रहिवाशी असलेला मुलगा. बिचारा खंडणीतून पैसे मिळविण्याच्या हव्यासापोटी मारल्या गेला. काय दोष होता त्याचा? काहीच नाही. परंतु वाईट प्रवृत्ती अशीही उफाळते व त्यातून निरपराधांचा अंत होतो. अशी कितीतरी बालकं व त्यांची झालेली हत्या. खरं तर हे चारच नाही तर देशातील कितीतरी बालकांचे लोकांनी अपहरण केले आहे आजपर्यंत. आज काय काळ आला आहे असं वाटतं. भोंदूबाबांच्या नादी लागून काहींचा नरबळी देण्यासाठी उपयोग केला जातो, तर काहींचा धर्म वाढविण्यासाठी तर याहीवर जाऊन काहींना वेश्या बनवून त्यांचा वापर पैसे कमविण्यासाठी केला गेला.

मुलं ही मायबापाची संपत्ती आहे. परंतु त्यांच्या बाळाची जेव्हा अशा प्रकारची हत्या होते तेव्हा त्यांना किती दुःख होत असेल याची कल्पनाही करता येत नाही. तेच प्रकट झालं आहे या कृतीतून. नागपुरात सध्या एक माणूस काय करु शकतो.



याचं एक उदाहरण. चांगला मार्ग मिळाला तर तो व्यक्ती चांगलंच बनणार व वाईट मार्गाचा अंत वाईटच. अथर्वच्या मारेकऱ्यांचाही अंत हा वाईटच होणार. परंतु आज तर त्याच्या आई-वडिलांना दुःख झालंय ना. त्यांचा लहान मुलगा अथर्व मारल्या गेला ना. तो काय आता परत येणार आहे?

विशेष म्हणजे चांगल्या माणसांमध्ये गुण वेगळाच असतो. चांगलं करताना प्रतिसाद मिळत नसेल तर त्याचं मन खट्टू होतं. त्यानंतर चांगला माणूस वाईट करण्याऐवजी चूप बसतो. तेच बरोबर असतं. परंतु वाईट माणसाला वाईट करताना आनंद वाटतो. मन खट्टू होत नाही. त्यातच कधीकधी कर्ज असतं माणसावर. शिवाय आजच्या काळात लोकं हे कलियुगात वावरत आहेत. ज्यातून राग, लोभ, द्वेष, अहंकार हे माणसांचे शत्रू बनत चालले आहेत. लोकांना कुणाचं चांगलं झालेलं बघवत नाही.

आनंदी आयुष्य ठेवायचं असेल तर वाद व स्वादाला अर्थ नाहक. जीभेला चांगला स्वाद जर मिळत नसेल तर दुःख होतं. तसंच दुःख वादातून येतं. लोकं लहान लहानशा गोष्टीवरून वाद करीत असतात. कधीकधी शेजारी किरकोळच कारणांवरून तसेच अर्ध्या अर्ध्या फुटाच्या जागेसाठी भांडणं करीत असतात. कधीकधी भाऊबहीण मालमत्तेसाठी एकमेकांशी भांडत असतात तर कधी शेजारचा शेतकरी धुऱ्यासाठी भांडत असतो. कधी कोण कोणत्या गोष्टीसाठी भांडण करेल. ते सांगता येत नाही. याच गोष्टीतून वातावरण बिघडतं व वातावरण बिघडलं की बस. लोकं त्याचा बदला म्हणून त्यांच्या अथर्व, युग, कुश आणि आदित्यसारख्या लहानशा मुलांवर डोळा ठेवतात. पर्यायानं त्यांचं रुपांतर हत्येत होतं.

आरसा पाहिला की, आपल्याला आपलं प्रतिबिंब दिसतं. तेच प्रतिबिंब दुसऱ्यांनाही दिसतं. परंतु त्यात लपलेला लबाडपणा जसा आपल्याला दिसतो. तसा इतरांना दिसत नाही. आपण जे कर्म करतो, त्याची शिक्षा आपल्याला नियती देतेच. जसे युग, कुश, आदित्यचे मारेकरी सापडले व त्यांना अटक झाली तसे. आता अथर्वचेही मारेकरी सापडले व त्यांना अटक केली गेली. हत्या करताना वाटलं असेल की आपला गुन्हा लपेल. तो गुन्हा लपवून नेता येईल. म्हणूनच गाडीही धुतली त्यांनी. परंतु वाईट कर्म वा पाप कधीच लपत नाही. ते उघड होतं. तेच घडलं या चारही मुलांच्या हत्येच्या वेळेस. त्यांची हत्या करणारे लवकरच गजाआड झाले.

हा झाला मानवी व्यवहार. माणसांच्या हातून पाप घडलं हत्येचं. ज्याची परिणती त्यांना अटक होण्यात झाली. पुढं खटला चालेल व खटल्यातून जन्मठेप किंवा फाशी. परंतु नियती कधीच चूप बसत नाही. ती बदला घेतेच. पाप हे फेडावंच लागतं. ती हत्या एखाद्या प्राण्यांच्याही रुपानं होवू शकते. जसे वाघाचा जन्म अथर्वला मिळू शकतो व बकरी किंवा एखाद्या पाळीव प्राण्यांचा जन्म त्या तिघांना. ती हत्या मानव व प्राण्यांच्या रुपात होवू शकते. जसा अथर्व कसाई बनू शकतो व मारेकरी कोंबडा किंवा बकरा. मग काय, अथर्व कसाई बनून त्यांची हत्या करु शकतो. त्यातच जसा अथर्व मरण पावताना तडपला असेल, तसे मारेकरीही तडपू शकतात, त्यांची हत्या हयात असताना. हाच नियतीचा बदला असेल. विशेष सांगायचं झाल्यास ही हत्या खंडणीसाठी झाली, असं मारेकऱ्यांनी कबूल केलं. परंतु खरं म्हणजे खंडणी वसूल करायला हेच लहान निष्पाप जीवं भेटले काय? हा प्रश्न अनेकांना पडतो. ज्यातून त्याचं उत्तर सापडत नाही.


आपण रामायण व महाभारत पाहिलं आहे व प्रत्येकांना रामायण, महाभारत आठवतंच. त्यात रामाला लोकं चांगलं म्हणतात व रावणाला वाईट. त्याचं कारण आहे. त्यांनी केलेलं कार्य. रावणानंही बळी घेतलेत आणि रामानंही बळी घेतलेत. परंतु रावणाकडून घेतल्या गेलेल्या बळीला हत्या म्हणतात व रामाकडून केल्या गेलेल्या बळींना वध म्हणतात. कारण रामानं चांगल्या गोष्टीसाठी बळी घेतले. अनेक निरपराधांना मारणाऱ्या रावणाला संपवून रामानं तिथं प्रजासत्ताक राज्य निर्माण केले. तसंच महाभारतात घडलं. महाभारतातही स्वतःच्या मातेसमान असणाऱ्या वहिनीला अर्थात द्रौपदीला दुर्योधनानं छळलं. ज्यातून महाभारत युद्ध घडलं.

सुंदर दिसावं म्हणून लोकं मेकअप करतात. तो सुंदर दिसण्यासाठीच. परंतु तो काही वेळानं उतरतोच. तसंच आहे. राग, द्वेष, लोभ आणि अहंकाराचं. राग, लोभ, द्वेष आणि अहंकारही काही दिवसानं उतरतोच, एखाद्या सुंदर चेहऱ्यावर मेकअप लावल्यासारखा.त्यातच मेकअप लावल्यानं जसा चेहरा काळवंडतो. तो चांगला दिसत नाही. तसाच राग, लोभ, द्वेष व अहंकारानंही माणूस बदनाम होतो. मग का बरं बाळगावा आपण राग, लोभ, द्वेष व अहंकार. ज्यातून आपल्याला हत्या करावी लागते? सुंदर चेहरा हा आपल्याला काही दिवसासाठीच जसा ठेवता येतो. तो काही दिवसानं उतरतो. तसंच पैशाचंही आहे. पैसा हा खंडणीस्वरुपात गोळा करा की वाईट मार्गानं. तो काहीच दिवसासाठी आपल्याजवळ टिकतो. तो जसा वाईट मार्गानं येतो तर त्यांचा अंतही वाईट मार्गानंच होतो.

विशेष म्हणजे आज आपण एखाद्या अथर्वची हत्या केली. परंतु जर उद्या याच नियतीनं आपल्याच घरच्या आपल्याच एखाद्या जीवलग अथर्वची हत्या केली तर आपल्याला कसं वाटेल? चांगलं वाटेल काय? नाही ना. मग आपण आज अथर्वची हत्या का करावी? महत्वपूर्ण बाब ही की एखादं चांगलं काम वा मदतीचा हात पिढ्यान्पिढ्या टिकते. त्याचा उदोउदो होतो. लोकं त्याची किर्ती पिढ्या न् पिढ्या गात असतात. जसे रामायण महाभारतातील चांगली पात्र. त्यानंतरचे तथागत गौतम बुद्ध, महम्मद पैगंबर, येशू ख्रिस्त, राजे विक्रमादित्य, हर्षवर्धन, सम्राट अशोक, महेंद्र व संघमित्रा, शिवाजी महाराज, संभाजी, ताराबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, म. गांधी, अशी कितीतरी नावं आहेत की ज्यांचं नाव काढलं की छाती भरुन येते. शरीरात नवा उत्साह निर्माण होतो. नवे कार्य करण्याची प्रेरणा मिळते आणि वाईट कामं केलीत तर ...त्याच्या नावानं लोकं पिढ्या न् पिढ्या बोटं मोडत असतात. त्यांना पिढ्या न् पिढ्या शिव्याशाप देत असतात. म्हणूनच चांगलं कार्य करावं. वाईट कार्य करु नये. तसंच कुण्या युग, कुश, आदित्य वा अथर्वची हत्या करु नये, त्यांचा जीव वाचवावा. त्यांना मदतीचा हात द्यावा. तरच आपलं नाव पिढ्या न् पिढ्या गर्जत राहते. ही पृथ्वी जेव्हापर्यंत जीवंत असते तेव्हापर्यंत. एई सत्पुरुष म्हणून अन् कुणाची विनाकारण हत्या करुन वाईट कर्म केलं तर त्या व्यक्तीची जगात निंदा नालस्ती होत असते. नावही गर्जत असते एक वाईट कर्माचा माणूस म्हणून. मग त्यांच्या पुतळ्याचं रावणाच्या पुतळ्यासमान दररोजच शिव्याशाप देवून दहन होत असतं. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# कला हा आपल्या संस्कृतीचा एक ठेवा...



समाजातील कलांचे महत्व खूप मोठे आहे. कला हा समाजाचा एक अविभाज्य घटक आहे आणि तो समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि मानसिक विकासामध्ये मोलाची भूमिका बजावते. कला ही विविध गोष्टीतून आपणास दिसून येत असते. ही कला जोपासण्याची व तिचे अस्तित्त्व टिकवून ठेवण्याचे काम हे आपणा सर्व मानव जातीस करावे लागते. कलांच्या विविध रूपांतून समाजाच्या विचारसरणी, संस्कृती, आणि ऐतिहासिक घटनांचे प्रतिबिंब दिसून येते.

कला समाजाच्या संस्कृतीचे प्रतीक आहे. नृत्य, संगीत, चित्रकला, नाटक, शिल्पकला या कलेच्या विविध प्रकारांमधून संस्कृतीचे जतन आणि संवर्धन होते. कला हा विचार, भावना आणि अनुभव व्यक्त करण्याचा प्रभावी मार्ग आहे. चित्र, संगीत, कविता, नाटक यांमधून कलाकार आपल्या भावना प्रभावीपणे मांडतात. कला लोकांना एकत्र आणते आणि सामाजिक एकता वाढवते. कला महोत्सव, नाटक, संगीत कार्यक्रम यामुळे समाजातील लोकांमध्ये संवाद साधला जातो.

कला मुलांच्या बौद्धिक आणि सृजनशील क्षमतेला चालना देते. शाळांमधील नाटक, संगीत आणि चित्रकला यामुळे विद्यार्थ्यांचे सर्जनशील विचार विकसित होतात. मानसिक आरोग्य तणाव कमी करण्यासाठी आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी उपयोगी आहे. नृत्य, रंगकाम, संगीत यामुळे मनःशांती मिळते. कलाक्षेत्रा तून अनेकांना रोजगाराच्या संधी मिळतात. नाटक, चित्रकला प्रदर्शन, संगीत कार्यक्रम यामुळे पर्यटनाला चालना मिळते. लोककला आणि आदिवासी कला यांसारख्या पारंपरिक कला समाजाच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

कलांमुळे विविध संस्कृतींची ओळख आणि त्यांची विविधता समजून घेता येते. कला जगभरातील लोकांच्या विचारधारांना आणि परंपरांना प्रदर्शित करते. कला व्यक्तीच्या भावनांचा आयाम जोडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. संगीत, चित्रकला, नृत्य, आणि रंगकला यांचा उपयोग करून व्यक्ती आपले अनुभव, दुःख, आनंद व्यक्त करतो. कलांमधून सामाजिक विषयांवर चर्चा होऊ शकते. कलाकार अनेकवेळा त्यांच्या कलाद्वारे समाजातील अन्याय, अयोग्य व्यवस्थापन, आणि इतर समस्यांवर प्रकाश टाकतात.

शिक्षणात कला समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळतो. कला माध्यमातून विचार करण्याची पद्धत विकसित होत जाते. कला हवी असलेल्या शांततेसाठी एकाद्या तंत्र म्हणून देखील काम करते. चित्रकला, संगीत, किंवा लेखनाद्वारे व्यक्ती आपले मन हलके करू शकतो, ज्यामुळे मानसिक आव्हानांचा सामना करणे सोपे होते. एकूणच, कलांचे स्थान समाजात अत्यंत महत्वाचे आहे, कारण ती व्यक्तींच्या जीवनात आनंद, प्रेरणा, आणि समर्पण आणते.

कला आपल्या संस्कृतीचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. कला विविध प्रकारांनी व्यक्त केली जाते, जसे की चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, नाटक, फिल्म, आणि साहित्य. ती आपल्या भावनांना, विचारांना आणि अनुभवांना व्यक्त करण्याचा एक माध्यम आहे. विविध कलाप्रकारांद्वारे आपण आपल्या संस्कृतीतील परंपरा, मूल्यांना पुढे नेत असतो. कला समाजात संवाद साधण्याचा, विचारांचा आदानप्रदान करण्याचा आणि एकत्र येण्याचा एक प्रगल्भ मार्ग आहे. कलेच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक ओळख, आदानप्रदान आणि समजूतदारपणा विकसित होतो. त्यामुळे कला फक्त एक अंगभूत गोडवा नाही तर ती आपल्या सांस्कृतिक इतिहासाचा आणि ओळखींचा महत्त्वाचा भाग आहे.

कलेचे महत्त्व केवळ सौंदर्य आणि मनोरंजनापुरते मर्यादित नाही, तर ती समाजाच्या विकासासाठी एक आवश्यक घटक आहे. नाटक, चित्रपट आणि काव्य यांचा वापर समाजातील समस्यांवर प्रकाश टाकण्यासाठी केला जातो. सामाजिक विषयांवर आधारित कलाकृती लोकांमध्ये जागरूकता निर्माण करतात. प्रत्येक समाजाची स्वतःची कला परंपरा असते, जी त्या समाजाची ओळख बनते. कला समाजाचा आरसा आहे. ती सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासात मोलाचे योगदान देते. कलांचे संवर्धन आणि प्रोत्साहन देणे हे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

**-श्रीकांत मगर**
नांदेड
मो. ९६८९११७१६९

# जागतिक कोकणी भाषा दिन

आज ९ एप्रिल, आजचा दिवस जागतिक कोकणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. मराठीची धाकटी बहीण म्हणून कोकणी भाषा ओळखली जाते. कोकणी भाषा म्हणजे गोव्याची भाषा असा एक समज आहे कारण कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे. गोव्याशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळातील काही भागात कोकणी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते.

कोकणी राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंध बोलीभाषा नसून तिच्यात एकूण आठ प्रकार गणले जातात. गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एक असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज भाषेचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणीही वेगळी आहे. शिवाय वारली, कोणकोणी, डांगी, चित्पावणी, मालवणी वैगरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या



उपभाषा आहेत. इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वात दक्षिण टोकाकडील भाषा आहे. तिचे नाते मराठी व गुजरातीशी आहे. कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रविड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत. कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे.

कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे. अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात. हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येईल मराठीतील मला या शब्दाला कोकणीत म्हाकां असे म्हणतात, मराठीत इकडे, इथे तर कोकणीत होतो हांगा. कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजेल. कोकणी भाषा ही जगातील सर्वात गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषेत बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे.

कोकणी भाषेसारखा आपलेपणा इतर कोणत्याच भाषेत नाही म्हणूनच कोकणी भाषा सर्वांना आपली भाषा वाटते. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील जेष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००६ साली हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा व्यक्त करून कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा देतो.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# पर्यावरणपुरक पत्रावळी-द्रोण लुप्त होण्याच्या मार्गावर

देशासह राज्यात लग्नसराई, धार्मिक व इतर कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक, कागदी व थर्माकोलच्या पत्रावळीचा वापर प्रचंड प्रमाणात होतांना दिसून येतो आणि ह्या पत्रावळी मानवाच्या व पशुंच्या आरोग्यासाठी दिवसेंदिवस विष बनताना दिसत आहेत. अनेक वर्षांपासून झाडांच्या पानांच्या पत्रावळीवर जेवणाची परंपरा चालत होती व यामुळे पानातील जीवनसत्वे आरोग्यासाठी अत्यंत लाभदायी होते व आरोग्य सुध्दा सुदृढ रहायचे. यातूनच ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार सुध्दा मिळत असे. परंतु आता अत्याधुनिक युगात यंत्राच्या साहाय्याने प्लास्टिक, कागदी व थर्माकोल यावर आवरण असलेल्या पत्रावळी व द्रोण विक्रीला आल्याने आरोग्याच्या दृष्टीकोणातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे.

राज्यासह देशात आपण निसर्गावर अत्याचार, अन्याय आणि हत्या करीत असल्याने अनेक महत्त्वपूर्ण वृक्ष नामशेष होत आहेत. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे आपण पूर्वी ज्या पर्यावरणपुरक पत्रावळीत आनंदाने आणि सुखासमाधानाने जेवणाचा स्वाद घेत होतो आणि



भाजी व कडीचा आनंद ज्या द्रोणच्या माध्यमातून मिळत होता तो आज पूर्णपणे संपुष्टात येवून लुप्त झाला आहे किंवा होण्याच्या मार्गावर आहेत. कारण पर्यावरणपुरक पत्रावळी-द्रोण याचे पूर्वी आगळेवेगळे महत्त्व होते आणि त्यातील जेवणाचा स्वाद आल्हादायक, आरोग्यदायक आणि मनाला आनंद देणारा होता.

आज कागदी पत्रावळी-द्रोण, प्लास्टिक पत्रावळी-द्रोण, थर्माकोलच्या पत्रावळी-द्रोण या विषेली वस्तूंनी संपूर्णपणे जेवणाच्या पर्यावरणपुरक पत्रावळी-द्रोणवर घणाघाती हल्ला करून नामशेष केला आहे. आपण समजू शकतो की, आज पळसाची पाने, मोहाची पाने, घोगराची पाने, टेंम्बुनचे पाने, कुड्याची पाने ज्यापासून पत्रावळी-द्रोण तयार होतात तेच झाडे आज वृक्षतोडीमुळे नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने आज आपल्यावर अशी दुर्गती आली आहे जे आपले जेवणाचे साधन नाही अशा प्लास्टिक, थर्माकोल व कागदी पत्रावळी-द्रोणाचा मोठ्या प्रमाणात वापर होतांना आणि याचा विपरीत व गंभीर परिणाम आरोग्यावर सुध्दा होत आहे.

नैसर्गिक विविध गुणधर्म असलेल्या पानांच्या हिरव्यागार पत्रावळीमध्ये जेवण करणे, हे मानवी आरोग्यासाठी मोठे फायदेशीर आहे असे ज्येष्ठ वयोवृद्ध व जाणकार आजही आपल्या अनूभवातून सांगतात. पानांच्या पत्रावळी-द्रोण शिवण्यासाठी बारीक कडुनिंबाच्या काड्या किंवा बांबूच्या काड्यांचा वापर केला जाई. पानांच्या पत्रावळीत केलेले जेवण पचनास हलके, रूचकर आणि आनंददायी वाटायचे. त्यामुळे पत्रावळीतील जेवणाचा स्वाद निराळाच होता. निसर्गावर अवलंबून असणाऱ्या कारागिरांच्या व्यवसायांवर येणारे संकट दूर करण्याचा प्रयत्न केंद्र व राज्य सरकारने केला पाहिजे व आपले आरोग्य सुध्दा सुरक्षित ठेवले पाहिजे.

नैसर्गिक विविध गुणधर्म असलेल्या हिरव्यागार पत्रावळी फक्त श्राद्ध पक्षात, पितृमोक्ष अमावस्या किंवा अन्य महत्त्वपूर्ण विविध कार्यक्रमांत किंवा पुजेच्या दरम्यान वापरतांना आपण पहातो. या संपूर्ण बाबींवर सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे व ज्या वनस्पती पासुन किंवा वृक्षांपासून ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होवू शकते अशा वृक्षांना पुनर्जीवित करून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. यामुळे पर्यावरणपुरक पत्रावळी-द्रोण तर मिळतीलच सोबतच वाढत्या हवामानातील बदलांवर मात करण्यास थोडी का होईना मदत अवश्य होईल.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त गोपाळचावडी येथे सर्व रोग निदान-उपचार शिबीर संपन्न; ग्रामस्थांचा प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक आरोग्य दिनानिमित्त डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जन औषध वैद्यकशास्त्र विभागातर्फे सर्वरोग निदान व उपचार शिबीर नांदेड तालुक्यात गोपाळचावडी येथे ७ एप्रिल रोजी उत्साहात पार पडले.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार पदवीपूर्व (एम.बी.बी.एस.) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फॅमेली ऑडॉप्शन प्रोग्राम हा भाग शैक्षणिक वर्षात समाविष्ट केला असल्याने ग्रामीण भागातील प्रत्यक्ष आरोग्य समस्या समजून घेण्याची आणि त्यावर उपाययोजना करण्याची संधी मिळावी. तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रुग्णसेवा, गृहभेटींचा अनुभव, आरोग्य जनजागृती व समुपदेशनामध्ये सक्रिय सहभाग घेता यावा, त्यामुळे त्यांचे शैक्षणिक तसेच सामाजिक भान अधिक वृध्दिंगत होण्यास मदत होणार आहे. भविष्यातील वैद्यकीय सेवेबाबत त्यांची दृष्टी अधिक व्यापक होईल, या हेतूने महाविद्यालयातील जनऔषधवैद्यकशास्त्र विभागाच्यावतीने गोपाळचावडी गावाची निवड केलेली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ व सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात उपस्थित ग्रामस्थांची पूर्णपणे विनामूल्य तपासणीसोबतच औषधोपचार व रक्त चाचण्या देखील मोफत करण्यात आल्या.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त दरवर्षी आरोग्यविषयक महत्वाच्या मुद्द्यावर भर दिला जातो. यंदाच्या दिनाचे ब्रिदवाक्य टुगेदर फॉर हेल्थ, स्टॅंड विथ सायन्स (आरोग्यासाठी एकत्र येऊया, विज्ञानाच्या बाजूने उभे राहूया) या संकल्पनेवर आधारित असून, समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे, चुकीच्या समजुती दूर करणे व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा बळकट करणे हा मुख्य उद्देश होता. या अनुषंगाने शिबिरात नागरिकांना योग्य जीवनशैली, नियमित तपासणी व लवकर निदान यांचे महत्व समजावून सांगण्यात आले.

या शिबिरात स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र, बालरोगशास्त्र, नेत्ररोग, कान-नाक-घसा शास्त्र शल्यचिकित्साशास्त्र, त्वचारोगशास्त्र, औषध वैद्यकशास्त्र अशा विविध विभागाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी सेवा दिली. एकाच छताखाली विविध तज्ज्ञांची उपलब्धता असल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला. शेकडो रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला असून लहान मुले, महिलावर्ग, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रौढ यांनी मोठ्याप्रमाणात सहभाग नोंदविला गेला. अनेक रुग्णांना प्रथमच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

# एमजीएममध्ये 'हॅकस्पेक्ट्रा २.०'ची सांगता; विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा उत्सव उजळला




**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड येथे दि. ४ व ५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'हॅकस्पेक्ट्रा २.०' या दोन दिवसीय राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. संगणकशास्त्र अभियांत्रिकी विभाग, इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स स्टुडंट्स चॅप्टर आणि गुगल डेव्हलपर्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान निर्मिती, संशोधनाची आवड आणि सृजनशील विचारसरणी विकसित व्हावी, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थाध्यक्ष कमलकिशोर कदम, एमजीएम अभियांत्रिकीच्या १९९१ च्या बॅचचे माजी विद्यार्थी दीपकराज सार (दिल्ली), एसजीजीएस तंत्रशास्त्र महाविद्यालयाचे संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. यू. व्ही. कुलकर्णी, महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर, उपप्राचार्य डॉ. शिरीष कोटगीरे, विभागप्रमुख डॉ. अर्चना राजूरकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. डॉ. भाग्यश्री कापरे व प्रा. हिमांशू जोशी यांनी काम पाहिले. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने गांधी प्रतिमा व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. भाग्यश्री कापरे यांनी केले, तर विभागप्रमुख डॉ. अर्चना राजूरकर यांनी या उपक्रमामागील उद्दिष्ट विद्यार्थ्यांसमोर मांडले. दीपकराज सार यांनी विद्यार्थ्यांना ऊर्जावान राहून प्रभावी संवादक बनण्याचा सल्ला दिला, तर डॉ. यू. व्ही. कुलकर्णी यांनी कुतूहल, सर्जनशीलता आणि धाडस या गुणांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. डॉ. गीता लाठकर यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आपल्या कार्यात सातत्य राखण्याचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात संस्थाध्यक्ष कमलकिशोर कदम यांनी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी समाजातील दैनंदिन समस्यांची जाणीव ठेवून त्यावर नावीन्यपूर्ण उपाय शोधावेत, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांचे छोटे संशोधनही देशाच्या प्रगतीत मोलाची भर घालू शकते, असेही त्यांनी अधोरेखित केले. या स्पर्धेत महाराष्ट्रभरातील ७८ संघांमधून सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समारोप समारंभासाठी एसजीजीएस तंत्रशास्त्र संस्थेचे माजी संचालक डॉ. वाय. व्ही. जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या संघांना एकूण एक लाख रुपयांची बक्षिसे प्रदान करण्यात आली.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ देवेंद्र गाडेकर (मास्टरकार्ड), अमित मिरकले (बार्कलेज), विनोद माळोदे (जनपॅक्ट) आणि धनंजय खराडे (जॉन डिअर) यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या योगदानाबद्दल संयोजकांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सुमारे ४० स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवनी येथील २१- शुगर कारखान्याने शेतकऱ्यांचे थकीत बील व्याजासह परत द्यावे -मनसेची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र निर्माण सेनेचे सदाशिव पाटील बोंढारकर यांनी शेकडो शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोहा तालुक्यातील शिवनी येथे असलेल्या २१- शुगरच्या युनिट क्रमांक तीन कारखान्याच्या जनरल मॅनेजरला निवेदन देऊन शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे थकलेले बील व्याजासह परत करावे, अशी मागणी करण्यात आली.

मनसे जिल्हाध्यक्ष मॉन्टेसिंग जहागीरदार यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांचे थकीत बील व्याज परताव्यासहित देण्यात यावे असे निवेदन २१ शुगर लिमिटेड युनिट नंबर तीनच्या जनरल मॅनेजर यांना देण्यात आले. यामध्ये विविध गावातून आलेले शेकडो ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. गरीब शेतकऱ्यांचे बील पाच ते सहा महिने थकीत असून त्यांच्या मुली-मुलांचे लग्न थांबले असून, काही शेतकऱ्यांच्या शेतातील मशागतीची कामे थांबली आहेत. खत-बियाण्यांसाठी पैसे नसल्याने त्यांनी उदरनिर्वाह व प्रपंच कसा चालवावा असा प्रश्न शेतकऱ्यांच्या वतीने मनसे जिल्हाध्यक्ष सदाशिव पाटील बोंढारकर यांनी उपस्थित केला आहे.

जर बिले लवकरात लवकर नाही मिळाले तर शेतकऱ्यांसह आंदोलन उभारू, असे निवेदनात त्यांनी म्हटले आहे. निवेदनावर जवळपास २५ हून अधिक शेतकऱ्यांच्या साक्षऱ्या आहेत.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम ८ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने नांदेड जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. या विशेष मोहीम शिबीर कार्यक्रमाचा जास्तीत जास्त अर्जदार-पालकांनी समिती कार्यालयात उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष, उपायुक्त तथा सदस्य व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी केले आहे.

राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव यांच्या निर्देशानुसार राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम येत्या ८ ते १४ एप्रिल या कालावधीत साजरा करण्याचा शासन निर्णय ३० मार्च २०२६ रोजी घेतला आहे. या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व प्रशासकीय विभागाच्या कार्यालयांना या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शासन निर्णयानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमाचे औचित्य साधून नांदेड जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात विशेष मोहीम शिबिर राबविण्यात येत आहे.

# गोदावरी नदी पुनरुज्जीवनासाठी नांदेड जिल्हा प्रशासनासोबत सामंजस्य करार



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्हा प्रशासनासोबत गोदावरी नदी खोऱ्याच्या पुनरुज्जीवनासाठी सामूहिक उपक्रम राबवण्यासाठी सामंजस्य करार डियाजियो इंडिया यांनी केला आहे. हा करार नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि डियाजियो इंडिया येथील मॅच्युरेशन अँड डिस्टिलेशन (नांदेड) चे महाव्यवस्थापक प्रकाश वामनराव बोडाडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या उपक्रमामुळे प्रदेशात शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन आणि पर्यावरणीय पुनर्स्थापनेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

या भागीदारीद्वारे डियाजियो इंडिया जिल्हा प्रशासनाला पाणी पुनर्भरण आणि वॉश (पाणी, स्वच्छता आणि स्वच्छतेच्या सवयी) संबंधित उपक्रम राबवण्यासाठी सहकार्य करणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय प्राधान्यक्रमाने जलस्रोतांची निवड करणे आणि संबंधित शासकीय योजनांशी समन्वय साधून जास्तीत-जास्त परिणाम साधणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल.

नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले, गोदावरी नदीचे पुनरुज्जीवन हे आमच्या प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ते लोकांच्या उपजीविका, शेती आणि पर्यावरणीय संतुलनाशी निगडित आहे. डियाजियो इंडिया सोबतचे हे सहकार्य सामूहिक प्रयत्नांची ताकद दर्शवते. पाणी पुनर्भरण उपक्रमांमुळे भूजल पातळी सुधारण्यास मदत होईल आणि शेतकऱ्यांना अधिक विश्वासार्ह सिंचन सुविधा मिळतील.

# बुध्द पहाट कार्यक्रमाची संयोजन समिती गठीत

**नांदेड (प्रतिनिधी)–** भगवान बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त बुद्ध पहाट या सांस्कृतिक कार्यक्रमाचे यंदा आयोजन केले आहे. त्यानिमित्त नुकतीच मुख्य संयोजक प्रमोदकुमार गजभारे यांच्या अध्यक्षतेखाली संयोजन समिती गठीत करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल अँण्ड कल्चरल मुव्हमेंट नांदेडनिर्मित प्रमोदकुमार गजभारे यांच्या वतीने बुद्ध पहाट हा सांस्कृतिक कार्यक्रम यावर्षी दि.२ मे रोजी पहाटे ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यंदा हे सलग १८ वे वर्षे असून, हा कार्यक्रम दि. १ मे रोजी बुद्ध पौर्णिमा या दिवशी महाराष्ट्र दिन असल्या कारणाने हा कार्यक्रम दि.२ मे रोजी पहाटे ५ वाजता डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे होणार आहे. सदरील कार्यक्रम हा सर्व जनतेत लोकप्रिय असून, बुद्ध धम्म उपासक-उपासिका यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. यावर्षी आतापासूनच धम्मबंधू उपासकातून उत्सुकता असून, त्याची जोरदार तयारी सुरू आहे. यावर्षी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समिती गठीत करण्यात आली असून ती पुढील प्रमाणे आहे. कार्यक्रमाचे मुख्य स्वागताध्यक्षपदी राजरत्न पवार हे असून, अध्यक्ष प्रभू सावंत, उपाध्यक्ष सुरेश गजभारे, विजय कांबळे, सचिव संदीप एडके, कार्याध्यक्ष आनंद जोंधळे, सहसचिव एम. टी. पंडित, कोषाध्यक्ष पंडित आढाव, मारुती कांबळे, संघटक दिनेश सूर्यवंशी, सहसंघटक अंकुशकुमार चित्ते, सल्लागार अनिल भद्रे, एस. व्ही. हनुमंते, सदस्य म्हणून नितीन विनकरे, शिवाजी सोनकांबळे, रवींद्र सोनकांबळे कल्हाळीकर आदींची निवड झाली.

# मिरवणूक मार्गाची स्वच्छता; ११ ते १४ एप्रिल संविधान जागृती मोहीम

## शहरात पहिल्यांदाच महामानवाच्या जयंतीनिमित्त उपक्रम

**लोहा (प्रतिनिधी)–** महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त लोहा शहरात पहिल्यांदाच नगरपालिकेच्या वतीने मिरवणूक मार्गावर स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख व टीमने हा उपक्रम हाती घेतला असून, शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. त्यानंतर महात्मा फुले जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नगर पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शहरवासीयांना जे आश्वासन दिले त्याची पूर्तता करण्यासाठी युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख हे प्रयत्नशील आहेत. नगरपालिका निर्मिती नंतर शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच महामानवाच्या जयंती निमित्ताने शहरात स्वच्छता मोहीम राबवून अभिवादन करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे

११ एप्रिल रोजी महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्ताने सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून ते बुद्ध विहार जुना लोहा हा मिरवणूक मार्ग स्वच्छ करण्यात येणार आहे. स्वच्छतेच्या माध्यमातून महान विचारांना अभिवादन करण्याचा हा एक प्रेरणादायी प्रयत्न आहे. लोकमान्य नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, छत्रपती धुतमल, बालाजी खिल्लारे, हरिभाऊ चव्हाण, सुधाकर पवार, भास्कर पवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, सर्व नगरसेवक टीम, जयंती मंडळाचे पदाधिकारी आणि गावातील स्वच्छताप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष शरद पवार व टीमच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंतीनंतर भीमजयंतीचे सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने शहर स्वच्छ केले जाणार आहे. नगरपालिका इतिहासात पहिल्यांदात महात्मा फुले - व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त स्वच्छता भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लोहा शहरात ११ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान नगरपालिकेच्या वतीने नागरिकांमध्ये संविधानाविषयी जागरूकता व्हावी याससाठी आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# पंतप्रधान मोदी यांचे सुरक्षा रक्षक ईश्वर ठाकूर यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** जम्मू कश्मीर या ठिकाणाहुन २५ वर्षे ८ महिने ४ दिवस देशसेवा पूर्ण करुन जन्म भूमीमध्ये सुखरुप परत आलेल्या व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सुरक्षा रक्षक ईश्वरसिंग नारायणसिंग ठाकूर यांचा नांदेडमध्ये सत्कार करण्यात आला.

ठाकूर यांनी सेवाकाळात देशातील विविध राज्यांच्या आंतरराष्ट्रीय सीमेवर कर्तव्ये बजावले. तसेच नक्षलवादी राज्यात कर्तव्ये बजावले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संघचालक सुधीर कोकरे यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून सेनेचे प्रदेशाध्यक्ष अजय सेंगर, सुनिल लोणे जितेंदर सिंग, अमरसिंह चव्हाण, अॅड. दिलीप ठाकूर, भाजपचे संतोष परळकर, रुपेश धनोरकर टाक, नारायण पांडे, रुपेश साखरे, जनार्दन शेजुळे यांची उपस्थिती होती.

# भोकर पोलिसांच्या कारवाईत १ लाख, ७ हजार रुपयांचा गुटखा जप्त

**भोकर (प्रतिनिधी)** –जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली भोकर पोलिसांनी गुटखा माफियांविरुद्ध धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत रविवारी सायंकाळी केलेल्या एका कारवाईत १ लाख ७ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६:१५ वाजण्याच्या सुमारास भोकर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अजित कुंभार यांना गोपनीय माहिती मिळाली की, किनवट रोडकडून बटाळा चौक ते म्हैसा बायपास रोडने एका काळ्या रंगाच्या दुचाकीवरून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक केली जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी डॉ. एकाळे यांच्या



शेताजवळ सापळा रचला.

या सापळ्यात संशयास्पद-रित्या येणाऱ्या स्पलेंडर मोटारसायकलला (क्रमांक MH२६-BB-८३२०) थांबवून तिची झडती घेतली असता, नायलॉनच्या पोत्यात राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला पान मसाला आणि गुटखा आढळून आला. यामध्ये फिरोझा पान मसाला २६० पाकीट (किंमत ३१,२०० रु.) गुटखा: १६५ पाकीट (किंमत ३१,३५० रु.) दुचाकी: ४५,००० रुपये किमतीची स्प्लेंडर, असा एकूण १,०७,५५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

याप्रकरणी आरोपी आमेर खान मुझफर खान (वय ३१ वर्ष, रा. खुदवाईनगर, देगलूर नाका, नांदेड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच तेलंगणा राज्यातील 'एस.एल. जर्दा' दुकानाच्या मालकावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या मोहिमेमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे.

# रेल मददद्वारे प्रवासी तक्रारींमध्ये लक्षणीय घट; नांदेड विभागाची उल्लेखनीय कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिणमध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवासी सेवांमध्ये सुधारणा करीत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. रेल मदद (Rail Madad) तक्रार निवारण मंचाद्वारे प्राप्त होणाऱ्या प्रवासी तक्रारींमध्ये लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे.

विभागातील विविध विभागांच्या समन्वयित प्रयत्नांमुळे तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देणे, सातत्यपूर्ण देखरेख ठेवणे आणि तक्रारींचे तातडीने निवारण करणे यामुळे गाड्या व रेल्वे स्थानकांवरील प्रवासी अनुभवात लक्षणीय सुधारणा झाली आहे.

या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सचखंड एक्सप्रेस या विभागातील महत्त्वाच्या गाडीबाबत प्राप्त होणाऱ्या प्रवासी तक्रारींमध्ये ४६% घट नोंदविण्यात आली आहे. तसेच विभागांतर्गत धावणाऱ्या सर्व गाड्यांबाबत एकूण २६% प्रवासी तक्रारींमध्ये घट झाली आहे.

रेल मदद मंचावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे सातत्याने परीक्षण करणे आणि संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून त्वरित निवारण करणे या प्रक्रियेचा या यशामध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

प्रवासी तक्रारींचे प्रभावी निवारण आणि प्रवासी समाधानासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्या हस्ते नांदेड विभागाला रेल मदद शिल्ड देऊन गौरविण्यात आले आहे.

या यशामध्ये योगदान देणाऱ्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समर्पित आणि समन्वयित कार्याचे वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे. भविष्यातही प्रवासी सेवांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी नांदेड विभाग कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

# लेखा विभाग सक्षम करण्यामागे चन्ना यांचे मोलाचे योगदान -कावली

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना यांनी आपल्या कार्यकाळात लेखा विभागाचे नेतृत्व अत्यंत सक्षमपणे करत जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या सखोल लेखा अभ्यास, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि काटेकोर अंमलबजावणीमुळे जिल्हा परिषदेचा कारभार सुरळीत व प्रभावीपणे चालला असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी व्यक्त केले.

३१ मार्च रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या शिवप्रकाश चन्ना यांच्या सेवापूर्तीनिमित्त मंगळवारी जिल्हा परिषदेच्या कै. शंकरराव चव्हाण सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी



त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, डी. बी. गिरी, अमित राठोड, प्रशांत थोरात, मयूरकुमार आंदेलवाड, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, कार्यकारी अभियंता संजय शिंदे, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, गट विकास अधिकारी विश्वनाथ अडबलवार, गट विकास अधिकारी शेखर देशमुख, उपशिक्षणाधिकारी निळकंठ पाचंगे, सेवानिवृत्त बाबुराव पुजरवाड, अविनाश देशमुख यांची उपस्थिती होती.

पुढे त्या म्हणाल्या की, चन्ना यांनी केवळ स्वतः उत्कृष्ट काम केले नाही, तर आपल्या सहकाऱ्यांकडूनही कोणताही त्रास न होता वेळेत कामे पूर्ण करून घेतली. विविध समित्यांसमोर त्यांनी आत्मविश्वासाने मांडणी केली. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून मी दिलेली कोणतीही जबाबदारी त्यांनी कधीही नकार न देता यशस्वीरित्या पूर्ण केली. त्यांच्या कार्याची मी वेळोवेळी खातरजमा केली असून, त्यांनी कधीही कामात चूक केली नाही, असे गौरवोद्गार काढले.

CMYK

फॅशन|संसार|सौंदर्य
सखी

# 'इन्फ्लुएन्सर'चे व्हिडिओ पाहून खरेदी करताय स्किन केअर प्रोडक्ट्स?

## ही सवय त्वचेला पोहोचवू शकते हानी!

**सोशल मीडिया आपल्या जीवनात इतका रुजला आहे की आपण स्वतःची काळजी आणि सौंदर्यासाठी रील्स आणि इन्फ्लुएन्सरच्या व्हिडिओंवर अवलंबून असतो. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की रील्समध्ये दिसणारी चमकदार त्वचेची रेसिपी तुमच्या त्वचेसाठी योग्य आहे का? डॉ. गौरव गर्ग (त्वचारोगतज्ज्ञ) स्पष्ट करतात की, इंटरनेटवर मिळणारी सर्वच माहिती अचूक नसते. त्यामुळे, सोशल मीडियावरील प्रत्येक ब्युटी ट्रेंड आजमावून पाहणे तुमच्या त्वचेला हानी पोहोचवू शकते.**




### ट्रेंड्सच्या झगमगाटामागे दडलेले धोके

त्वचेच्या काळजीचे उपाय वैद्यकीय सल्ल्यापेक्षा इन्फ्लुएन्सर्सद्वारे सोशल मीडियावर अधिक वेगाने पसरतात. संशोधनानुसार, जेव्हा आपण एकाच वेळी अनेक उत्पादने वापरण्यास सुरुवात करतो आपल्या त्वचेच्या खऱ्या गरजा न समजल्यामुळे, त्वचेचा नैसर्गिक संरक्षक थर खराब होऊ शकतो. यामुळे लालसरपणा, मुरुमे आणि जळजळ यांसारख्या सामान्य समस्या उद्‌भवतात. जे उत्पादन एका व्यक्तीसाठी खूप प्रभावी ठरते, ते तुमच्या संवेदनशील त्वचेसाठी हानिकारक ठरू शकते.

### सक्रिय घटकांचे चुकीचे मिश्रण

व्हायरल ट्रेंड्समध्ये अनेकदा रेटिनॉइड्स आणि ॲसिड्ससारख्या शक्तिशाली सक्रिय घटकांच्या वापराची शिफारस केली जाते. परंतु, नवशिक्यांनी किती प्रमाणात सुरुवात करावी, कोणते घटक एकत्र वापरल्यास हानिकारक ठरू शकतात किंवा वापराची योग्य पद्धत कोणती, याबद्दल त्यात माहिती दिली जात नाही. अशा परिस्थितीत, अपूर्ण माहितीमुळे अशी स्किनकेअर उत्पादने वापरली जाऊ शकतात जी तुमच्या त्वचेला हानी पोहोचवतात. एएचए/बीएचए (AHA/BHA) आणि रेटिनॉइड्स नेहमी हळूहळू आणि कमी प्रमाणात वापरावेत. शिवाय, ते एकत्र वापरल्याने त्वचेला नुकसान होऊ शकते. तसेच, तुमच्या आवडत्या इन्फ्लुएन्सरला आवडणारे उत्पादन तुमच्या त्वचेसाठी योग्य असेलच असे नाही. प्रत्येकाची त्वचा आणि गरजा वेगवेगळ्या असतात.

### घरगुती उपाय नेहमीच प्रभावी नसतात

इंटरनेटवर घरगुती उपायांनी भरलेले आहे. लोक अनेकदा चेहऱ्यावर लिंबाचा रस किंवा बेकिंग सोडा लावण्याचा सल्ला देतात, पण यामुळे त्वचेला हानी पोहोचू शकते. लिंबाचा रस त्वचेची नैसर्गिक pH पातळी बिघडवतो, ज्यामुळे त्वचा सूर्यप्रकाशासाठी खूप संवेदनशील बनते. बेकिंग सोडा त्वचेचा मऊपणा काढून टाकतो, ज्यामुळे त्वचा कोरडी आणि निर्जीव होते. म्हणून, कोणताही घरगुती उपाय करून पाहण्यापूर्वी, तो तुमच्या त्वचेसाठी योग्य आहे की नाही हे पाहण्यासाठी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

### फिल्टर्सची चमक

सोशल मीडियावर दिसणारी निर्दोष त्वचा अनेकदा फॉर्म्युलाने नव्हे, तर फिल्टर्स आणि प्रकाशयोजनेने मिळवलेली असते. या खोट्या मानकांच्या मागे लागून, लोक महागडी उपकरणे आणि अनेक उत्पादने खरेदी करतात. अतिरिक्त थर लावल्याने केवळ त्वचेवर ताण येत नाही, तर जेव्हा अपेक्षित परिणाम मिळत नाहीत तेव्हा आत्मविश्वासही कमी होतो.

### त्वचेच्या काळजीचे योग्य नियम



- निरोगी त्वचेसाठी त्वचेच्या काळजीची एक साधी दिनचर्या आवश्यक आहे.
- क्लिन्झिंग : दिवसातून दोनदा सौम्य क्लिन्झरने आपला चेहरा स्वच्छ करा.
- मॉइश्चरायझिंग : आपल्या त्वचेसाठी योग्य असलेले मॉइश्चरायझर लावा. ओलावा टिकवून ठेवण्यासाठी.
- सनस्क्रीन : जर तुम्ही सनस्क्रीन लावत नसाल, तर तुमची त्वचेची काळजी घेण्याची दिनचर्या वाया जात आहे. त्यामुळे, दररोज सनस्क्रीन लावणे आवश्यक आहे.

# सौंदर्यवर्धक कोरफड!



**हल्लीच्या या धकाधकीच्या दिवसांमध्ये मोबाईलला आणि अत्याधुनिक जीवनशैलीला जितकं महत्त्व दिलं जातं तितकं महत्त्व आपल्या आरोग्याला मात्र दिलं जात नाही. अनेकदा धकाधकीत आपण स्वतःकडे लक्ष देणं विसरतो. त्याचे परिणाम आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यातून आपल्याला सहज दुसून येतात. जेवणाच्या वेळा, खात असलेले पदारथ, अपुरी झोप, प्रदूषण, ताण यांचा शरीरावर आणि मनावर होणारा परिणाम दिसून येतो. त्वचा हे परिणाम दाखविणारा महत्त्वाचा घटक आहे. शरीराचा अतिसंवेदनशील भाग असणाऱ्या त्वचेवरुनही एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याचा अंदाज सहज लावणं शक्य होतं. त्वचा निरोगी ठेवण्यासाठी जाहिरातींमध्ये दाखवल्याप्रमाणे महागड्या क्रिम किंवा सौंदर्यप्रसाधनांचा वापर करण्याची आवश्यकता नसते, तर घरगुती उपचारांनीही त्वचेच्या समस्या दूर होऊ शकतात. त्यासाठी योग्य गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे. त्वचेचं सौंदर्य आणि आरोग्य हे दोन्ही चांगले ठेवायचे असेल तर कोरफड आणि हळद हे अतिशय उपयुक्त पदार्थ आहेत. पाहूयात हळद आणि कोरफडीचे त्वचेच्या दृष्टीने होणारे फायदे....**

### त्वचेचा रुक्षपणा कमी करण्यासाठी...

- अनेकांची त्वचा कोरडी असते. अशांना हिवाळ्यात त्वचेची आग होण्याचा त्रास होते. पण त्वचेमध्ये असणाऱ्या पाण्याच्या प्रमाणाचा समतोल राखण्यासाठी कोरफड आणि हळद हे रामबाण उपाय ठरतात. ज्यासाठी १ टीस्पून हळद आणि कोरफडीचा गर आणि काकडीचा रस हे सर्व पदार्थ एकत्र करुन ही पेस्ट पंधरा ते वीस मिनिटं चेहऱ्यावर लावून ठेवावी आणि त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवावा.
- वाढणारे वय लपण्यास मदत : वाढत्या वयोमानानुसार चेहऱ्यावर सुरकुत्या येतात. या सुरकुत्या दिसू नयेत यासाठी ठराविक वयोगटातील महिला आणि पुरुष अनेक प्रयत्न करतात. मात्र त्याचा म्हणावा तितका फायदा होतो असे नाही. कोरफड आणि हळदीच्या वापरामुळे मात्र या सुरकुत्या कमी दिसण्यास मदत होते. १ टीस्पून नारळाचं तेल, १ टीस्पून कोरफडीचा गर आणि १ टीस्पून हळद या एकत्र करुन हा लेप चेहऱ्याला लावा. दोन मिनिटं हा लेप ठेवल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा.
- त्वचेचे संसर्ग टाळण्यासाठी : खरुज आणि नायटा यांसारख्या त्वचारोगांवर उपचार म्हणूनही कोरफड आणि हळदीचा वापर होतो. ज्या ठिकाणी नायटा किंवा खरुजाची लागण झाली आहे तिथे हळद आणि कोरफडीचा लेप लावल्यास तो भाग लवकर बरा होतो. हळद आणि कोरफड यांच्यामध्ये असणाऱ्या औषधी गुणधर्मांमुळे हे शक्य होतं. हा लेप तयार करण्यासाठी चमचाभर नारळाचं तेल, कोरफडीचा गर आणि हळद घेऊन ही पेस्ट त्वचेवर साधारण अर्ध्या तासासाठी लावून ठेवा आणि त्यानंतर कोमट पाण्याने धुवा.
- मुरुमं नाहीशी करण्यासाठी : त्वचेच्या रंध्रांमध्ये प्रदूषणामुळे जिवजंतू शिरकाव करतात. त्यांचा नायनाट करून त्वचेचं सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी सुद्धा कोरफड आणि हळदीचा सर्रास केला जातो. यामुळे चेहऱ्यावर येणारी मुरुमं कमी होतात. चेहऱ्यावर लावण्यात येणारा हा लेप तयार करण्यासाठी एक चमचा हळद आणि कोरफडीचा गर आणि एक चमचा मध यांचं एकत्र मिश्रण करुन हे मिश्रण मुरुमं असणाऱ्या भागांवर साधारण पंधरा मिनिटांसाठी लावा आणि त्यानंतर चेहरा कोमट पाण्याने धुवा. काहीवेळा असे केल्यास मुरुमं कमी होण्यास मदत होते.



# सौंदर्य गोरेपणावर नव्हे त्वचेच्या निरोगीपणावर अवलंबून!

**प्रत्येक व्यक्तीला आपण सुंदर आणि आकर्षक दिसावं असं नेहमीच वाटत असतं. प्रत्येक व्यक्ती खरेतर जन्मतः सुंदरच असते. निसर्गाने प्रत्येकाला सुंदर केस, सुंदर त्वचा दिलेली असते. परंतु नंतर हळूहळू प्रदूषण, चिंता, कृत्रिम गोष्टींमुळे, चुकीच्या आहार-विहारामुळे नैसर्गिक सौंदर्य कमी कमी होत जाते. स्त्रिया एका वर्षात सुंदर दिसण्यासाठी किंवा सौंदर्याविषयी काही प्रयोग करण्यासाठी साधारणपणे ४०० तास खर्च करतात, असे एका सर्वेक्षणातून लक्षात आले आहे.**



प्रत्येक स्त्री सुंदर व आकर्षक दिसू शकते. ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असेल तर सौंदर्य हे केवळ पांढऱ्या रंगावर (गोऱ्या रंगावर) अवलंबून नाही तर त्वचा किती निरोगी आहे त्यावर अवलंबून असते. केसांचे सौंदर्यसुद्धा केवळ लांबीवर अवलंबून नसते तर ते किती निरोगी, चमकदार आहेत यावर अवलंबून असते. स्त्रीचे वय कितीही असले तरी किंवा केसांचा -त्वचेचा रंग कसाही असला तरी ते निरोगी असतील तरच ते सौंदर्यात भर टाकतात. केस, त्वचा त्याचप्रमाणे इतर अवयवांची काळजी कशी घ्यावी याविषयी काही उपाय थोडक्यात पाहूया...

### काही तक्रारी

- **रुक्ष त्वचा**
- **तेलकट त्वचा**
- **त्वचेवर मुरुम, तारुण्यपिटिका**
- **त्वचा काळवंडणे, वांग येणे, चेहऱ्यावर खूप तीळ.**
- **सुरकुत्या**
- **निस्तेज त्वचा**
- **डोळ्यांभोवती काळी वर्तुळे**

### रुक्ष त्वचा

त्वचेचा नैसर्गिक कोरडेपणा किंवा तेलटकपणा हा आपल्या त्वचेतील तैलग्रंथीवर अवलंबून असतो. ऊन, धूळ, प्रदूषण, तीव्र रासायनिक सौंदर्य प्रसाधने यामुळे त्वचेतील पाण्याचे प्रमाण कमी होते आणि त्वचा रुक्ष आणि निस्तेज दिसू लागते. त्वचेतील पाण्याच्या प्रमाणावर त्याची कांती (ग्लो) अवलंबून असतो. जर त्वचेतील पाण्याचे प्रमाण कमी झाले तर त्वचा काळवंडल्यासारखी होते. वयोमानानुसार त्वचेतील कोलॅजिनचे प्रमाण कमी होते आणि त्यामुळेही त्वचा रुक्ष होते. अतिप्रमाणात साबणाच्या वापरामुळेही त्वचेला रुक्षता येते.

### अंतर्मनाचा आरसा

चेहरा हा नेहमीच आपल्या अंतर्मनाचा आरसा असतो. आपण निरोगी असू तर त्याचे प्रतिबिंब आपल्या चेहऱ्यावर किंवा त्वचेवर लगेचच दिसून येते. सध्याच्या धावपळीच्या किंवा स्पर्धेच्या युगात आणि घरातील जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांना स्वतःची काळजी घेण्यासाठी फारसा वेळच मिळत नाही. त्यामुळे काही वेळा लवकर फरक दिसावा याच्यासाठी स्वतःच्या मनानेच काही चुकीच्या सौंदर्य प्रसाधनांचा वापर केला जातो. (बाजारात सध्या अशाच काही स्टिरॉईडस् असलेल्या क्रीम मिळत आहेत) अशा चुकीच्या क्रीममुळे अतिशय वाईट दुष्परिणाम पहायला मिळतात.



### रुक्ष त्वचेसाठी उपाय

- आंघोळीसाठी खूप गरम पाण्याचा वापर करू नये.
- साबणाने वारंवार चेहरा धुवू नये.
- तीव्र रासायनिक सौंदर्य प्रसाधनांचा वापर टाळावा.
- चांगल्या प्रतिच्या मॉईश्चराईजरचा वापर करावा.
- आंघोळीनंतर खोबरेल तेलाचे तीन-चार थेंब पाण्यात मिक्स करून लावल्यानंतरही त्वचेचा कोरडेपणा कमी होतो. खोबरेल तेलाप्रमाणेच बदाम तेल, कुंकुमादि तेलाचाही वापर करता येतो.
- अँटीऑक्सिडंट असणाऱ्या पदार्थांचा जेवणात वापर करावा. (उदा. आवळा, लिंबू, गाजर)
- ग्लिसरिनचा चांगला उपयोग कोरड्या त्वचेसाठी होतो. (एक चमचा ग्लिसरिन एक चमचा गुलाबजल एकत्र करून कोरड्या त्वचेवर लावणे.)
- कोरफड गर आंघोळीच्या आधी १० मिनिटे लावून ठेवून नंतर धुतल्यास त्वचेचा कोरडेपणा कमी होतो.
- तेलाप्रमाणेच काही फळांचाही वापर आपण पॅक म्हणून करू शकतो.
- अर्धे पिकलेले केळे कुस्करून घेणे. त्यात एक चमचा खोबरेल तेल एकत्र करून हे मिश्रण २० मिनिटे चेहऱ्यावर लावून ठेवावे आणि नंतर धुवून टाकावे.
- दोन चमचे बेसन पीठ, अर्धा चमचा आंबे हळद, १ चमचा मध, १ चमचा दुधाची साय, गुलाबपाणी एकत्र करून त्याची पेस्ट करून घ्यावी. ही पेस्ट पूर्ण चेहऱ्याला लावून २० मिनिटे ठेवून नंतर धुवून टाकावे. हा पॅक आठवड्यातून एकदा जरूर वापरावा.

# कोरफड जेल रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवल्यास काय होते?

आपलीही त्वचा नितळ, सुंदर आणि डागविरहित असावी, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. पण मुरुम, डाग इत्यादी समस्यांमुळे सौंदर्यामध्ये बाधा निर्माण होते. प्रदूषित वातावरण आणि बदलती जीवनशैली यामुळे चेहऱ्यावरील नैसर्गिक चमक नाहीशी होऊ लागते. त्वचेवर ग्लो येण्यासाठी काही जणी भरपूर प्रमाणात केमिकलयुक्त ब्युटी प्रोडक्ट्सचा वापर करतात. पण कित्येकदा या उत्पादनांमुळे चेहऱ्याचे नुकसान होते. संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी नैसर्गिक घरगुती उपचार करण्यावर भर द्यावा. पण हे उपाय देखील डॉक्टरांचा सल्ला घेऊनच करावेत. कोरफड जेल हे सर्व प्रकारच्या त्वचेसाठी लाभदायक आहे. त्वचेची देखभाल करण्यासाठी हा सर्वात स्वस्त आणि मस्त उपाय आहे. कोरफड जेलमधील पोषण तत्त्वांमुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते. कोरफडमध्ये हर्बल आणि औषधी गुणधर्मांचा साठा आहे. ज्यामुळे त्वचा आणि केसांशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते. ॲलोव्हेरा जेल आपल्या त्वचेसाठी कसे लाभदायक ठरते? जाणून घेऊया याबाबतची सविस्तर माहिती...

### चेहऱ्यावर ॲलोव्हेरा जेल लावण्याचे फायदे

कित्येक ब्युटी प्रोडक्टमध्ये ॲलोव्हेरा जेलचा वापर केला जातो. सौंदर्य प्रसाधनांप्रमाणेच कोरफडचा रस देखील चेहऱ्यासाठी लाभदायक आहे. या औषधी वनस्पतीमध्ये ७५ प्रकारचे घटक असतात. ज्यामध्ये मुख्यतः व्हिटॅमिन, खनिजे, सॅलिसिलिक ॲसिड, लिग्निन, सॅपोनिन यांचा समावेश असतो. केमिकलयुक्त प्रोडक्टमुळे होणारे दुष्परिणाम पाहता प्रत्येक जण आता आयुर्वेदिक, हर्बल उपचार करण्यावर भर देत आहेत. नैसर्गिक उपचारांमुळे चेहऱ्याला दीर्घ काळासाठी फायदे मिळतात आणि महत्त्वाचे म्हणजे डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपाय केल्यास दुष्परिणामही होत नाहीत.

- कोरफड आणि काकडी : काकडी व कोरफड एकत्र करून चेहरा आणि डोळ्यांच्या आसपास लावा. कोरफड जेल आणि काकडी मिक्सरमध्ये वाटून घ्या. यानंतर एका स्वच्छ कापडाच्या मदतीने काकडी - कोरफडचा रस बाउलमध्ये गाळून घ्या. हा रस तुम्ही कापसाच्या मदतीने आपल्या चेहऱ्यावर लावू शकता. याद्वारे तुमच्या त्वचेला व्हिटॅमिन ईचा पुरवठा होईल आणि त्वचा हायड्रेट राहण्यासही मदत मिळेल. हवे असल्यास तुम्ही व्हिटॅमिन ई तेलासह देखील कोरफड जेल मिक्स करू शकता. नियमित हे उपाय केल्यास चेहऱ्यावर सकारात्मक बदल पाहायला मिळतील.
- ॲलोव्हेरा फेस स्क्रब : कोरफड जेल आणि ग्राउंड ओटमील एकत्र घ्या. जाडसर मिश्रण तयार करा. नियमित या स्क्रबचा वापर करावा. ओटमील आपली त्वचा एक्सफोलिएट करण्याचं कार्य करते. तर कोरफडमुळे त्वचेला थंडावा मिळतो.
- चेहऱ्यासाठी ॲलोव्हेरा लेप : तुमच्या घरामध्ये कोरफडचे रोपटे असेल तर त्यातील ताजा गर काढून घ्या. यामध्ये ऑलिव्ह ऑइल किंवा नारळाचे तेल मिक्स करा. मिश्रण तयार झाल्यावर चेहऱ्यावर लावा. हेअर पॅक म्हणूनही याचा वापर होऊ शकतो.
- कोरफड जेल रात्रभर चेहऱ्याला लावण्याचे फायदे : आपल्या चेहऱ्यावर शुद्ध कोरफड जेलनं मसाज करा आणि रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवा. यातील पोषण तत्त्वांमुळे त्वचेला लाभ मिळतात. सर्वप्रथम फेस वॉशने आपला चेहरा स्वच्छ धुऊन घ्या. कॉटनच्या कापडाने चेहरा पुसून घ्यावा. यानंतर कोरफड जेल चेहरा आणि मानेवर लावा. आवश्यकता वाटल्यास तुम्ही एसेंशियल ऑइलचाही वापर करू शकता. चेहऱ्याचा हलक्या हाताने मसाज करा आणि रात्रभर जेल चेहऱ्यावर राहू द्या. नियमित स्वरुपात हा उपाय केल्यास त्वचेवर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते. मुरुम, मुरुमांचे डाग देखील कमी होतात.



# मागासवर्गीय समुदायाचे सदस्य असणे हा सरकारी नोकरीत सवलत मिळवण्याचा आधार नाही; सर्वोच्च न्यायालयाचा महत्वाचा निर्वाळा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** मागासवर्गीय समुदायाचे सदस्य असणे हा केवळ सरकारी नोकरीत सवलत मिळवण्याचा आधार नाही. असे महत्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलं आहे. केवळ मागास समुदायाचा सदस्य असणे ही बाबच उमेदवाराच्या बाजूने पारडे झुकवू शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले आहे. तसेच, केवळ सहानुभूती किंवा सामाजिक पार्श्वभूमीचा विचार करून सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार प्रदान केला जाऊ शकत नाही, असा महत्वपूर्ण निर्वाळाही न्यायालयाने दिला आहे.

न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने असे नमूद केले की, जर सर्व उमेदवारांना समान आणि निष्पक्ष संधी मिळण्याची खात्री करायची असेल, तर सार्वजनिक नोकरीच्या बाबींमध्ये कृपा, दानशूरता किंवा करुणा यांना दूरच ठेवले पाहिजे. केवळ एखादी व्यक्ती मागासवर्गीय समुदायाची आहे, या एकाच कारणावरून निर्णयाचा तराजू एका बाजूने झुकवला जाऊ शकत नाही, असे खंडपीठाने ४ एप्रिल रोजी जाहीर केलेल्या आपल्या निकालात स्पष्ट केले. दिल्ली पोलिसांनी दाखल केलेले एक अपील मंजूर करताना न्यायालयाची ही निरीक्षणे समोर आली.

भरती प्रक्रियेच्या एका अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर उपस्थित राहण्यात अपयशी ठरलेल्या एका उमेदवाराला दुसरी संधी देण्याचे निर्देश 'केंद्रीय प्रशासकीय लवादाने' आणि 'दिल्ली उच्च न्यायालयाने' दिले होते. या निर्देशांविरुद्ध दिल्ली पोलिसांनी हे अपील दाखल केले होते. हे प्रकरण अशा एका उमेदवाराशी संबंधित होते, ज्याने कॉन्स्टेबल पदाच्या भरती प्रक्रियेचा प्राथमिक टप्पा यशस्वीरित्या पार केला होता. परंतु जानेवारी २०२४ मध्ये आजारपणाचे कारण देत, तो 'शारीरिक क्षमता आणि मोजमाप चाचणी'साठी उपस्थित राहिला नाही. असे असूनही, उढ ने दिल्ली पोलिसांना त्या उमेदवाराला पुढील तुकडीसोबत ही चाचणी देण्याची परवानगी देण्याचे निर्देश दिले होते आणि सप्टेंबर २०२५ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयानेही हा निर्णय कायम ठेवला होता. किंबहुना, सर्वोच्च न्यायालयाने हा दृष्टिकोन अमान्य ठरवला. या प्रकरणाचे वर्णन 'बेजबाबदारपणाचे एक उत्तम उदाहरण' असे करताना, खंडपीठाने नमूद केले की, त्या उमेदवाराने नियोजित तारखेला उपस्थित न राहण्याचा निर्णय घेऊन 'एक सुवर्णसंधी वाया घालवली' आहे. न्यायालयाने यावर भर दिला की, भरती प्रक्रिया विशेषतः ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक नोकऱ्यांचा समावेश असतो.

# बेपत्ता मुलीच्या शोधात गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

**बीड (प्रतिनिधी) –** राज्यात गुन्हेगारी चांगलीच फोफावली आहे. त्यात खून, खंडणी तसेच मुली बेपत्ता होण्याचे देखील प्रमाण वाढले आहे. मुलींच्या तसेच महिलांच्या अपहरणाचा मुद्दा मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत देखील मांडला होता. आता असाच बेपत्ता होण्याचा प्रकार बीडमध्ये झाला आहे. मात्र, यात वेगळाच ट्विस्ट पाहायला मिळत आहे. बीडच्या माजलगाव शहरातील एक तरुणी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या शोधत एक पोलिस कर्मचारी पुण्यात आला होता. तपास पूर्ण केल्यानंतर तो परत बीडला गेला आणि मध्यरात्री २ वाजता त्याने आपले आयुष्य संपवले. आता पुण्यात नेमके असे काय घडले? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव शहर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले ३५ वर्षीय पोलिस कर्मचारी बाळकृष्ण जायभाये यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली




असून, या घटनेमुळे संपूर्ण पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे. जळगाव शहरातील एका बेपत्ता मुलीच्या तपासासाठी पुणे येथे गेलेले जायभाये हे संबंधित तपास आणि काम व्यवस्थित पूर्ण करून रात्री उशिरा घरी परतले होते. मात्र त्यानंतर त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. तसेच त्यांनी ही आत्महत्या का केली? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

पुण्यावरून तपास पूर्ण करून परतल्यानंतर अवघ्या काही वेळातच, पहाटे दोनच्या सुमारास त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत असून, त्यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळताच परिसरात मोठी गर्दी जमली होती. या हृदयद्रावक घटनेमुळे पोलिस दलातील त्यांच्या सहकाऱ्यांना मोठा मानसिक धक्का बसला असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

बेपत्ता झालेल्या मुलीच्या शोधात गेलेले पोलिस कर्मचारी बाळकृष्ण जायभाये यांच्यासोबत पुण्यात नेमके काय झाले? असा सवाल उपस्थित होत आहे. प्राथमिक माहितीनुसार कोणतीही सुसाईड नोट अद्याप मिळालेली नाही, त्यामुळे आत्महत्येचे गूढ वाढले आहे. आता पोलिसांनी बाळकृष्ण जायभाये यांच्या जवळच्या नातेवाईकांकडे विचारपूस सुरू केली आहे. या प्रकरणी बीड शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

# करिअरची भीती दाखवून तरुणींचे लैंगिक शोषण; ५ आरोपींना अटक

**नाशिक (प्रतिनिधी) –** नाशिक शहरात एकीकडे अशोक खरात प्रकरणाची चर्चा गरम असतानाच, आता कॉर्पोरेट जगताची मान शरमेने खाली घालायला लावणारा एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. नाशिकमधील एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत कामाला असलेल्या १८ ते २५ वयोगटातील तरुणींचे लैंगिक आणि मानसिक शोषण करण्यात आल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी मुंबई नाका पोलिस ठाण्यात आतापर्यंत ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांनी ६ आरोपींविरुद्ध कारवाई करत ५ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंपनीतील टीम मॅनेजर आणि त्याच्या काही सहकाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून हा किळसवाणा प्रकार केला. करिअरमध्ये अडथळे आणण्याची किंवा नोकरीवरून काढून टाकण्याची भीती दाखवून या तरुणींना जाळ्यात ओढले जात होते. कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेसाठी असलेले नियम पायदळी तुडवत या तरुणींचा विनयभंग आणि मानसिक छळ करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे, यामध्ये पीडितांच्या धार्मिक भावना दुखावल्याचेही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.




या प्रकरणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेता, नाशिक पोलिस आयुक्तांनी तातडीने संदीप मिटके यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. प्राथमिक अंदाजानुसार, या शोषणाचे बळी ठरलेल्या मुलींची संख्या २० ते २५ च्या घरात असण्याची शक्यता आहे. याप्रकरणी एकूण ६ आरोपी निष्पन्न झाले असून, त्यात ५ पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. पोलिसांनी ५ पुरुषांना अटक केली असून, एक महिला आरोपी अद्याप फरार आहे. अटक केलेल्या पाचही आरोपींना आज न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

# १२०० सिलेंडरचा घोळ आणि ७ लाखांची अफरातफर; गॅस वितरकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**धाराशिव (प्रतिनिधी) –** धाराशिवमध्ये गॅस स्टॉक आणि वितरण व्यवस्थेत मोठी तफावत आढळल्याने निर्माण झालेल्या तणावातून ज्ञानेश्वर माळी या गॅस वितरकाने जीवन संपवण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कंपनीच्या तपासणीनंतर समोर आलेल्या १२०० सिलेंडरच्या घोळासह सुमारे सात लाख रुपये किमतीच्या सिलेंडरची बेकायदेशीररीत्या विक्री केल्याच्या चर्चेमुळे माळी प्रचंड मानसिक दडपणाखाली होते. सद्यस्थितीत त्यांच्यावर सोलापूरमधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास पोलिसांनी हाती घेतला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील गॅस वितरक ज्ञानेश्वर माळी यांनी कंपनीच्या तपासणीत साठा आणि वितरण यामध्ये मोठी तफावत आढळल्याने निर्माण झालेल्या मानसिक तणावातून आत्महत्येचा प्रयत्न केला. गेल्या अनेक दिवसांपासून या वितरकाकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी असल्याने गॅस कंपनीने त्यांचा पुरवठाही बंद केला होता, ज्यामुळे ते प्रचंड दडपणाखाली होते अशी माहिती समोर आली आहे.विशेष म्हणजे, सध्या आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे धाराशिव जिल्ह्यात गॅस टंचाईची गंभीर समस्या जाणवत असतानाच, गॅस कंपनीच्या बैठकीत डीलरने हे टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच तामलवाडी पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, या प्रकरणाचा नेमका उलगडा करण्यासाठी त्यांनी पुढील तपास सुरू केला आहे.



नागपूरच्या जरीपटका परिसरात गॅस सिलिंडर वितरणास होणाऱ्या विलंबामुळे संतापलेल्या नागरिकांनी चक्क सिलिंडर पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बराच वेळ रांगेत उभे राहूनही सिलिंडर मिळत नसल्याने संतप्त जमावाने हे टोकाचे पाऊल उचलले होते. मात्र माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर आणि समजुतीनंतर नागरिकांनी पळवून नेलेले सिलिंडर पुन्हा एजन्सीकडे सुपूर्द केले असून, या गोंधळामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा (खु.) ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ९८ मधील शिवराय पार्क शिवराय नगर मधील प्लॉट नं. १० व १३ ज्याची साईज ३० बाय ७५ असून ज्याचे प्रत्येकी क्षेत्रफळ अंदाजे २२५० चौ.फुटाचा प्लॉट निझार निरूद्दीन लालाणी यांच्याकडून योगेश प्रभाकरराव डांगे यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉट क्र. १० ची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. १३, पश्चिमेस - प्लॉट नं.९, दक्षिणेस - ३० फुटाचा रोड व उत्तरेस - प्लॉट नं. ११.

प्लॉट क्र. १३ ची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. १४, पश्चिमेस - प्लॉट नं.१०, दक्षिणेस - ३० फुटाचा रोड व उत्तरेस - प्लॉट नं. १२.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत योगेश प्रभाकरराव डांगे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**योगेश प्रभाकरराव डांगे**
**रा. छत्रपती चौक, नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी सारिका परशूराम शिंदे या नावाची बारावी कला पासची टी.सी. कंधार ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. उत्तम नरहरी कदम**
**सारिका परशूराम शिंदे**
**रा. मरळक ता.जि. नांदेड**

# स्थगिती आदेशानंतरही वृक्षांचे बळी : हरित लवादाकडून वृक्षतोड थांबविण्याचे आदेश

**नाशिक (प्रतिनिधी) –** वृक्षतोडीच्या मुद्यावरून पर्यावरणप्रेमी आक्रमक झालेले असतानाच महापालिकेच्या उद्यान विभागाचा गलथान कारभारही समोर आला आहे. महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार दर ५ वर्षांनी वृक्षगणना करणे बंधनकारक आहे. पालिकेने २०१८ नंतर अद्याप नव्या वृक्षगणनेचा अहवालच जाहीर केलेला नाही. विशेष म्हणजे, २०२४ मध्ये ८ कोटी रुपये खर्चून नवीन गणनेचे काम सुरू करण्यात आले होते. तरी, मात्र ८ वर्षांपासून शहराच्या हरितसंपदेची नेमकी स्थिती काय, हे उद्यान विभागाने समोरच आणलेले नाही.

२०१७-१८ मध्ये झालेल्या वृक्षगणनेत शहरात ४७,९५,३८७ झाडे आढळली होती. यात २५७ प्रजातींची नोंद झाली होती. मात्र, यात चिंतेची बाब म्हणजे ४५ टक्के झाडे ही विदेशी गिरिपुष्प (ग्लीरिसिडीया) प्रजातीची होती.

## Change In Name

My Old Name is **Vaishnavi Rajendraji Kabra / Vaishnavi Kabra** which now I am changing as New Name **Vaishnavi Rajendra Kabra.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Rajendra Rameshwar Kabra H.No. 2-12-336, Flat No. 5, Ashwini Appartment, Banda Ghat Road, Vazirabad, Near P.N. College, Nanded**

## Change In Name

My Old Name is **SHAIKH SADDAM** which now I am changing as New Name **SHAIKH SADDAM SHAIKH YUSUF NICHALKAR** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - 2-5-267, DULHESHA RAHEMAN NAGAR, NEAR CHOTI MASJID, NANDED - 431601**

## Change In Name

My Old Name is **SHAIKH PIRMAHAMAD SAB ALABAKSH** which now I am changing as New Name **SHAIKH MOHAMMAD ALABAKSH** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - SHAIKH MOHAMMAD ALABAKSH, 102 JAWAI NAGAR, NAGAR, Po. NAIGAON TQ. NAIGAON DIST. NANDED

## Change In Name


My Old Name is **MD ASHFAQ ALI** which now I am changing as New Name **ASHFAQUE ALI SARDAR ALI** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** Plot No,33 Gausiya Manzil Chaitnya Nagar Taroda Bk. Nanded -431605 Mo.No. 9423441436



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**जाहिरप्रगटन**

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९५/२०२६
**शिला व ईतर विरुध्द निरंक**

**अर्जदार :-** १. शिला भ्र. रविंद्र कंदुर्के, वय- ३९ वर्षे,
२. ऋषीकेश पि. रविंद्र कंदुर्के, वय- २२ वर्षे,
३. ऋतुजा पि. रविंद्र कंदुर्के, वय- १६ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्र.१
४. ललीता भ्र. परशुराम कंदुर्के, वय- ६० वर्षे,
सर्व रा. चिंचाळा ता. बिलोली जि. नांदेड

**विरूध्द**
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **रविंद्र परशुराम कंदुर्के** यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे. आणि अर्जदार क्र. ४ ही आई आहे. अर्जदार हे मौजे चिंचाळा ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **रविंद्र परशुराम कंदुर्के** यांचा मृत्यु दिनांक **दि.२६/०१/२०२६** रोजी आकस्मीक मृत्यु झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **रविंद्र परशुराम कंदुर्के** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १२/०६/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. ०८ एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

**जाहिरप्रगटन**

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३/ २०२६** पुढील तारीख - ०८.०५.२०२६

अर्जदार : ०१. सुनिता भ्र. शिवराज शिवशेटटे, वय - ३३ वर्षे, व्यवसाय - घरकाम व शेती,
०२. श्रेया पि. शिवराज शिवशेटटे , वय - १२ व्यवसाय - शिक्षण ,
०३. शिवन्या पि. शिवराज शिवशेटटे , वय - १० व्यवसाय - शिक्षण ,
अर्जदार क्रमांक ०२ व ०३ यांचे अ.पा.क. सख्खी आई सुनिता भ्र. शिवराज शिवशेटटे,
०४. नागरबाई भ्र. भाउसाहेब शिवशेटटे , वय - ७८ वर्षे, व्यवसाय - घरकाम,
सर्व रा. दर्यापूर ता. बिलोली जि. नांदेड.

**विरुध्द.**

गैरअर्जदारः निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत शिवराज भाउसाहेब शिवशेटटे** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ हि **मयत शिवराज भाउसाहेब शिवशेटटे** यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे मुलेअ आहेत व अर्जदार क्रमांक ०४ हि **मयत शिवराज भाउसाहेब शिवशेटटे** यांची आई आहे.**मयत शिवराज भाउसाहेब शिवशेटटे** यांचा मृत्यु दिनांक ०८.०५.२०२५ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ ह्यांना **मयत शिवराज भाउसाहेब शिवशेटटे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली

आदेशावरून,
7/4/26
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,
बिलोली

## यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादीत जिल्हा नांदेड.

नोदणी क्रमांक एनएनडी/एनएनडी/बीएनके/ओ/३२९/१९९६ दिनांक २५/०३/१९९६.

दिनांक:- ०६/०४/२०२६.

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस**

यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादीत जिल्हा नांदेड च्या सर्व सन्माननीय सभासदांना सूचित करण्यात येते की, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १३/०४/२०२६ रोज सोमवार सकाळी ठिक ३:०० वाजता संस्थेचे प्राधिकृत अधिकारी श्री. बी.बी.बोधगिरे यांचे अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. सदर सभेत खालील विषयाप्रमाणे कामकाज केले जाणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

१. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड या संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षाकरीता संचालक मंडळाच्या होणा-या निवडणूकीसाठी उमेदवार, मतदार, सूचक व अनुमोदक होणेसाठी प्रतिनिधीस अधिकार देणे बाबत...

**(बी.बी.बोधगिरे)**
**प्राधिकृत अधिकारी**
यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादीत जिल्हा नांदेड.

## पांचाली तालुका शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादीत ता. कंधार/ लोहा जि. नांदेड.

नोंदणी क्रमांक एनएनडी/वेडी आर/बीएनके/११०२/१९८४ दिनांक ०७/०३/१९८४

दिनांक:- ०५/०४/२०२६.

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस**

पांचाली तालुका शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादीत ता. कंधार/ लोहा जि. नांदेड च्या सर्व सन्माननीय सभासदांना सूचित करण्यात येते की, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १२/०४/२०२६ रोज रविवार सकाळी ठिक ३:०० वाजता संस्थेचे प्राधिकृत अधिकारी श्री. बी.बी. बोधगिरे यांचे अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. सदर सभेत खालील विषयाप्रमाणे कामकाज केले जाणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

१. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड या संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षाकरीता संचालक मंडळाच्या होणा-या निवडणूकीसाठी उमेदवार, मतदार, सूचक व अनुमोदक होणेसाठी प्रतिनिधीस अधिकार देणे बाबत...

**(बी.बी.बोधगिरे)**
**प्राधिकृत अधिकारी**
पांचाली तालुका शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादीत ता. कंधार / लोहा जि. नांदेड.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## इनाम जमिनी, अतिक्रमित निवासी शासकीय जमिनी व सिडको घरांबाबत समिती स्थापन करा

### खा. अशोकराव चव्हाण यांची पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

**नांदेड (प्रतिनिधी) –** शहर आणि जिल्ह्यातील सामान्य नागरिकांच्या थेट घरांशी आणि जमिनींशी निगडित असलेल्या तीन महत्त्वाच्या विषयांसंदर्भात माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना पत्र लिहिले असून, ही कामे निश्चित कालमर्यादेत वेगाने पूर्ण करण्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमण्याची सूचना केली आहे.

खा. अशोकराव चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, इनाम जमिनी नियमित करून घेण्याबद्दल राज्य शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने नांदेड शहरातील विषय तातडीने मार्गी लावण्यात यावेत, अतिक्रमित निवासी शासकीय जमिनी नियमाकूल करण्यासंदर्भात शासनाने काढलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संपूर्ण नांदेड जिल्ह्यात पुढील कार्यवाही सुरू करावी, तसेच दीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या नांदेड शहरातील 'सिडको'च्या घरांच्या हस्तांतरणांच्या अनुषंगाने ही घरे संबंधित नागरिकांच्या नावे करण्यासंदर्भात आवश्यक प्रक्रिया सुरु करून त्याबाबत राज्य शासनाला पुढील प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावा. त्याचप्रमाणे तिन्ही विषय तातडीने आणि सुसूत्रतेने मार्गी लागावेत यासाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याची सूचना खा. अशोकराव चव्हाण यांनी केली आहे.

समितीमध्ये उपजिल्हाधिकारी दर्जाचा महसूल अधिकारी, मनपा उपायुक्त (मनपा हद्दीसाठी) आणि सिडकोच्या कामासाठी वरिष्ठ सिडको अधिकारी यांचा समावेश असावा, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. या पुढाकारामुळे नांदेडमधील हजारो नागरिकांच्या घरांचा आणि हक्काच्या जमिनींचा प्रश्न सुटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आज राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी) –**राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष नरेंद्र ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड यांच्यातर्फे शनिवार ९ मे २०२६ रोजी जिल्हा न्यायालय नांदेड व जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालय येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, धनादेश अनादरीत झाल्याबाबत प्रकरणे, तसेच कौटुंबिक न्यायालयातील तडजोड होण्यायोग्य प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण मंच, सहकार न्यायालय व कामगार न्यायालयातील प्रकरणे इत्यादी तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय सदर लोकअदालतीत दाखलपूर्व प्रकरणे जसे थकीत मालमत्ता कर, थकीत विद्युत बील, थकीत टेलीफोन बील, विविध बँकांचे कर्ज वसुली प्रकरणे, थकीत पाणी बील, ईत्यादी प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत.

## आमदार श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन

**भोकर (प्रतिनिधी) –** भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार अॅड. श्रीजयाताई अशोकराव चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नातून भोकर शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त झाला आहे. बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी आमदार चव्हाण यांच्या हस्ते शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील विविध विकासकामांचे उत्साहात भूमिपूजन करण्यात आले.



**अंगणवाड्यांसाठी ३७.५० लाखांचा निधी**

प्रभाग क्रमांक ३ मधील लक्ष्मीनगर, शेख फरीद आणि प्रभाग क्रमांक १० मधील बिलालनगर येथील नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येकी १२ लाख ५० हजार रुपये निधीतून तीन नवीन अंगणवाडी इमारतींच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. यामुळे परिसरातील बालकांच्या शिक्षणाचा आणि आरोग्याचा प्रश्न सुटणार आहे. तसेच, शहरातील वाल्मिकी समाजासाठी स्वतंत्र सभागृह बांधकामाच्या निधीला मंजुरी देऊन त्याचेही भूमिपूजन यावेळी करण्यात आले.नगरसेविका आरतीताई यशवंतकर यांच्या कार्यशैलीबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी प्रभागातील प्रलंबित प्रश्नांबाबत आमदार श्रीजयाताई चव्हाण यांना निवेदन देण्यात आले.

आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरणारे डंपिंग ग्राऊंड इतरत्र हलवण्यात यावे, प्रभाग ३ च्या विकासासाठी अधिकचा विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, बौद्ध आणि हिंदू धर्मासाठी स्वतंत्र स्मशानभूमीची व्यवस्था करावी, क्रीडा संकुलाचे रेंगाळलेले काम तातडीने पूर्ण करावे, नगरपरिषद वाचनालयात पुस्तकांचा पुरवठा करून ते सर्वांसाठी खुले करावे या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन आमदार महोदयांनी दिले.

या दौऱ्यात मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहाचा 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह' असा नामविस्तार करण्यात आला. यावेळी वसतिगृहाच्या गृहपाल सुमित्रा साळुंके यांनी आमदारांचे स्वागत करून त्यांना 'संविधान उद्देशिका' भेट दिली. आमदार चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. गृहपाल साळुंके यांनी वसतिगृहाची प्रवेश क्षमता वाढवण्याची व नवीन इमारत बांधण्याची मागणी केली, ज्याचे आमदारांनी कौतुक करत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, संचालक रामचंद्र मुसळे, नगरसेवक नाजीम शेख, विठ्ठल धोंडगे, सिध्देश्वर पिटलेवाड,डॉ. फिरोज इनामदार, अविनाश वाघमारे, गणेश यशवंतकर, सना इनामदार, योगेश भोकरकर, पंकज पोकलवार, डॉ. बालाजी अंदबोरीकर, डॉ. राम नाईक यांच्यासह परिसरातील नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्कॉर्पिओसह तीन जणांना अटक; नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

**नांदेड(प्रतिनिधी) –**हडको परिसरातील गोपाळचावडी कमानीसमोर मंगळवार, दि. ७ एप्रिल रोजी रात्री नांदेड ग्रामीण पोलिसांनी स्कार्पिओ जप्त करून तीन जणांना अटक केली. त्यांच्या जवळून पोलिसांनी तलवार व खंजर जप्त केले आहे.



उस्माननगर रोडवरील गोपाळचावडी गेट समोर स्कार्पिओ व काही युवक थांबले असून ते संशयास्पद हालचाली करीत असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी मंगळवारी रात्री मनजितसिंग बलविरसिंग बावरी रा. असर्जन, जीतुसिंग श्यामसिंग कल्याणे, जैसीसिंग धारासिंग टाक रा. नवीन कौठा, नांदेड या तीन जणांना अटक केली. त्यांच्या जवळून दोन तलवार, दोन खंजर व स्कार्पिओ (एमएच १२-यूएन- ००५०) पोलिसांनी जप्त केली.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक बापूराव चव्हाण यांच्या फिर्यादीवरून तीन जणांविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले.

## जलजीवन व स्वच्छ भारत कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे तब्बल चार महिन्यांचे वेतन थकीत राहिल्याने राज्यभरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या या कर्मचाऱ्यांनी शासनाविरोधात आक्रमक भूमिका घेत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

राज्यातील जिल्हा व तालुका स्तरावरील जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील वेतन अद्याप मिळालेले नाही. वारंवार पाठपुरावा, निवेदने व आंदोलने करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला आहे.

## भ्रष्ट अभियंत्याला १ वर्ष सक्तमजुरीसह १० हजार रुपये दंडाची शिक्षा; भोकर न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**भोकर (प्रतिनिधी) –** शाळेच्या खोली बांधकामाचा थकीत धनादेश देण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या पंचायत समितीच्या अभियंत्याला भोकर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने दोषी ठरवत १ वर्ष सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. तुकाराम आनंदराव चौतमल असे शिक्षा झालेल्या तत्कालीन अभियंत्याचे नाव असून, या निकालामुळे शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



फिर्यादी अशोक गंगाधर सोळंके हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताटकळवाडी ता. भोकर येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. २०१३ मध्ये 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत शाळेच्या एका खोलीच्या बांधकामासाठी ३ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर झाला होता. या बांधकामातील शिल्लक १८,९०० रुपयांचा धनादेश मिळवण्यासाठी फिर्यादींनी पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी कार्यालयातील अभियंता तुकाराम चौतमल यांची भेट घेतली होती. धनादेश देण्यासाठी आरोपी चौतमल याने सुरुवातीला ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती २,५०० रुपये देण्याचे ठरले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या पडताळणीत लाचेची मागणी सिद्ध झाली आणि त्यानंतर १५०० रुपये स्वीकारताना आरोपीला रंगेहात पकडण्यात आले होते. २०१४ मध्ये भोकर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा (गु.र.न. २२/२०१४) दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा खटला भोकर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात माननीय मोहम्मद नसिर मोहम्मद सलीम यांच्यासमोर चालला. सरकारी वकील अनुराधा डावखरे यांनी एकूण ६ साक्षीदार तपासले आणि भक्कम पुरावे सादर केले.

कलम १३(१)(डी) व १३(२) अन्वये: १ वर्ष सक्तमजुरी आणि ५,००० रुपये दंड. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाची तरतूदही करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपअधीक्षक भीमराव शिंगाडे यांनी केला होता. केस निरीक्षक म्हणून पोलीस निरीक्षक रसूल तांबोळी यांनी काम पाहिले. न्यायालयीन कामकाजात महिला पोलीस कॉन्स्टेबल वैशाली पुंडगे आणि पोलीस हवालदार बाबुराव सावळे यांनी सहकार्य केले. शासकीय कामात पारदर्शकता राहावी आणि भ्रष्टाचाराला आळा बसावा, यासाठी हा निकाल महत्वाचा मानला जात आहे.

## महापौरांची वृत्तपत्र वितरण सेंटरला भेट

**नांदेड (प्रतिनिधी) –**महापौर सौ. कविताताई मुळे यांनी नुकतीच शहरातील वृत्तपत्र वितरण सेंटरला सदिच्छा भेट दिली, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ यांनी कविताताई मुळे आणि संतोष मुळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार, विसावा उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा बेग, कर्मचारी कदम, वितरण व्यवस्थापक गणपत बनसोडे, ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते सरदारसिंह चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्याध्यक्ष बालाजी पवार यांनी संघटनेने आजवर केलेल्या कामाचा आढावा सादर केला. ते म्हणाले की, महापालिका प्रशासन तसेच माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण आणि अमर राजूरकर यांनी नेहमीच वृत्तपत्र विक्रेत्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. मात्र, अद्यापही काही महत्त्वाचे विषय प्रलंबित आहेत. यामध्ये प्रामुख्याने वृत्तपत्र विक्रेत्यांचा घरकुल योजनेत समावेश, शहरात वृत्तपत्रांसाठी कायमस्वरूपी स्टॉल आणि पंतप्रधान स्वनिधी योजनेचा लाभ मिळवून देणे या मागण्यांचा समावेश आहे. महापौरांनी या विषयांत वैयक्तिक लक्ष घालून ते मार्गी लावावेत, अशी विनंती पवार यांनी केली.

यावेळी बोलताना महापौरांनी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कार्याचे कौतुक केले आणि



प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत माहिती पोहोचवणाऱ्या या कष्टकरी वर्गाच्या पाठीशी प्रशासन खंबीरपणे उभे राहील, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ तर आभार गणेश वडगावकर यांनी मानले. या प्रसंगी कोषाध्यक्ष बाबू जल्देवार, सहसचिव भागवत गायकवाड, संदीप कटकमवार, विठ्ठल फडेवार, निळकंठ सोनटक्के, सत्यनारायण देवरकोंडा, संजय गोते, बालाजी चंदेल, प्रवीण कुलकर्णी, अवधूत पसलवाड, प्रशांत बलगुरी, सत्यनारायण आंधे,सुरेश चितगिरे, शेख उस्मान, अशोक खुणे आदी वृत्तपत्र विक्रेते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काँग्रेस पक्षाचे आजपासून संघटन सृजन अभियान

**नांदेड (प्रतिनिधी) –** काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने राज्यभरात संघटन सृजन अभियान सुरू आहे. दरम्यान नांदेड जिल्ह्यात आजपासून संघटन सृजन अभियानास सुरुवात होत असून आठ सदस्यीय निरिक्षकांची समिती नांदेड येथे येत आहे, अशी माहिती खा. रवींद्र चव्हाण, दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

काँग्रेस पक्षांतर्गत संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने राज्यभरात संघटन सृजन अभियान सुरू आहे. दरम्यान नांदेड जिल्ह्यात आजपासून सदर अभियान सुरू होत असून आठ सदस्यीय निरीक्षकांची समिती येत आहे. यात अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने हरकला वेणूगोपालराव, प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने माजी मंत्री यशोमती ठाकूर, श्रीशैल्य उटागे, महेश गंगाने, रवींद्र दळवी, अशोक पाटील निलंगेकर, अमर खानापुरे, डॉ. सतिश पाचपुते आदी निरिक्षकांचा समावेश असणार आहे. ही समिती शहरासह तालुकास्तरावर बैठका घेणार आहे, अशी माहिती खा. रवींद्र चव्हाण, दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

## तुकाराम मुंढे यांची बदली त्वरित रद्द करा; सकल दिव्यांग संघटनेची राज्य शासनाकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी) –**दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची बदली राज्य शासनाने केली असून, ती बदली त्वरित रद्द करावी या मागणीसाठी सकल दिव्यांग संघटनेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले.

दिव्यांगांना समाजामध्ये चांगले प्रकारे स्थान मिळावे, केंद्र व राज्य शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात, दिव्यांग मंत्रालयाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी काटेकोरपणे राज्य शासनाच्या योजना राबवून दिव्यांगांना न्याय दिला व बोगस दिव्यांगांना योजनेतून बाद केले आहे. बोगस दिव्यांग शाळेवरील शिक्षकांची चौकशी सुरू केली. राज्य शासनाच्या सेवेमध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्रधारकांनाही चौकशी लावून बोगस प्रमाणपत्रधारक शोधून काढले, अशा अधिकाऱ्यांची राज्य शासनाने तडकाफडकी बदली केली असून ती बदली त्वरित रद्द करा, त्यांना त्याच



पदावर तीन वर्षे ठेवा, संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील थकीत मानधन उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करा, आमदार-खासदारांचा निधी त्वरित खर्च करा, जिल्हा नियोजन समितीकडील दिव्यांगांचा १ टक्का राखीव निधी खर्च करा, आजवर केलेल्या आंदोलनातील मागणीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी त्वरित करा, आदी मागण्यांसाठी सकल दिव्यांग संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून धरणे आंदोलन करून निवेदन देण्यात आले आहे.

## किनवट-नांदेड महामार्गावर टेम्पो-दुचाकीचा अपघात; तिघे गंभीर जखमी

**किनवट (प्रतिनिधी) –**किनवट-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरच्या कोठारी पेट्रोल पंपाजवळ बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी सायंकाळी छोटा टेम्पो व मोटारसायकलचा भीषण अपघात झाला. या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

किनवट - नांदेड राष्ट्रीय महामार्गावरच्या कोठारी पेट्रोल पंपावरून दुचाकीत पेट्रोल भरून किनवटकडे येणाऱ्या दुचाकीला बोलेरो पिकअपच्या चालकाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात बोलेरो वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खड्ड्यात जाऊन पडले. अपघातात



पिकअप चालक नितीन मनोहर पाले (वय ३५ रा. महुदा ता. कामठी, जि. नागपूर) तसेच मोटारसायकलवरील महेंद्र श्रावण घुले (वय ४७, रा. अंबाडी ता. किनवट) व महेश शामराव मेश्राम (वय २२, रा. भीमपूर ता. किनवट) हे तिघेही गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत सर्व जखमींना गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तिघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याने प्रथमोपचारानंतर तिघांनाही आदिलाबाद येथे हलविण्यात आले. दरम्यान, या दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com